# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ७, १९४७ (शके)

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | मृद व जलसंधारण मंत्री | |
| (४) | उद्योग, मराठी भाषा मंत्री | |
| (५) | महिला व बालविकास मंत्री | |
| (६) | ग्रामविकास व पंचायत राज मंत्री | |
| (७) | कामगार मंत्री | |
| (८) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

---

## आशागड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेबाबत

**(१) * ७६३५ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशागड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे एका गर्भवती महिलेची प्रसुती परिचारिकेकडून करण्यात आली असल्याची तसेच सदर आरोग्य केंद्रात आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याने माता व नवजात बालकांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली असून सदर आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची सातत्याने अनुपस्थिती, मनुष्यबळाचा अभाव आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्य सेवा विस्कळीत झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी व इतर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच गर्भवती महिलेची प्रसूती प्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) प्राथमिक आरोग्य केंद्र, आशागड, ता.डहाणू, जि.पालघर येथे डॉक्टर अनुपस्थित असल्यामुळे एका गर्भवती महिलेची प्रसुती परिचारिकेकडून करण्यात आली हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये डॉ.कृतिका जनाथे, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी व डॉ. रुपाली मालवणकर, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या विनापरवानगी गैरहजर राहिल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत.

तर डॉ. क्षितीजा पाटील, प्रभारी वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या दिनांक १९/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंठा (जि.जालना) येथे स्वतंत्र औद्योगिक वसाहत सुरु करण्याबाबत

**(२) * ७३१८ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) ला १९९२ पासून तालुक्याचा दर्जा मिळालेला असून या ठिकाणी स्वतंत्र औद्योगिक वसाहत सुरु करण्याबाबत अनेक वेळा शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्ह्यातील मंठा येथे औद्योगिक वसाहत निर्माण करुन नवउद्योजकांना उद्योग सुरु करण्यासाठी प्रोत्साहीत करून तसेच सदर औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाच्या औद्योगिक धोरणाचा वापर करुन उक्त परिसरात जमीन संपादित करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत जनतेला लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

मंठा हे तालुक्याचे ठिकाण असून सदर शहर हे राष्ट्रीय महामार्गालगत आहे. त्याठिकाणी औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी लागणारी भौगोलिक माहिती तसेच २५.० हे. आर पेक्षा जास्त सलग शासकीय जमीन उपलब्धतेबाबत म.औ.वि. महामंडळाच्या मार्फत तालुका महसूल कार्यालयाकडे माहितीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच मंठा तालुक्याजवळच मऔवि महामंडळाने ६३.१५ हे. आर क्षेत्रावर परतूर विकास केंद्र स्थापन केलेले असून सदर केंद्र कार्यान्वित आहे.
(२) मंठा येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी महसूल विभागाकडून सरकारी जमीन उपलब्धतेबाबत माहिती प्राप्त करून घेणेची कार्यवाही सुरू आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर सदरबाबतची माहिती प्राप्त होताच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदी व औद्योगिक क्षेत्राची सुसाध्यता तपासून पुढील भूसंपादनाची कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाड्यांकरीता स्मार्ट किट खरेदीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत

**(३) * ७०८२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाने राज्यातील ५,४६९ अंगणवाड्यांसाठी रुपये १ लाख ६४ हजार ५६० इतक्या अधिक किंमतीचे स्मार्ट किट खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून, स्मार्ट किट खरेदीचा ठेका तीन वर्षांसाठी गुनिया कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला देण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मार्ट किटमध्ये डिजिटल लर्निंग स्कूल, फर्निचर, खेळ सामग्री आणि उपकरणांचा समावेश असून याबाबतचे टेंडर मंजूर होण्याचा वेग आणि स्पर्धा मर्यादित ठेवण्याच्या पध्दतीवर खरेदी प्रक्रियेची पारदर्शकता विभागाकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनेक अंगणवाड्यांना इमारती नसतानाही या किटचा वापर कसा करावा याबाबत अंगणवाडी सेविकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून त्याकरीता ९० कोटी रुपयांचा करार मंजूर झाल्याने सर्वत्र तीव्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील अंगणवाड्यांचा तात्काळ आढावा घेऊन स्मार्ट किटच्या निर्णयाचा फेरविचार करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील अंगणवाडी केंद्राचे आदर्श अंगणवाडीमध्ये रुपांतर करण्याकरीता आदर्श अंगणवाडी ही राज्य योजना शासन निर्णय दिनांक ११/०४/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली असून सदर योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अंगणवाडी केंद्रांचे आदर्श अंगणवाडी केंद्रात रुपांतर करणेसाठी स्मार्ट अंगणवाडी किट उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाच्या खरेदी धोरणानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेअंती मे. गुनिना कमर्शियल्स प्रा. लि. या L१ निविदाधारकाकडून प्रति संच रुपये १,६४,५६०/- (सर्व करासहित) प्रमाणे स्मार्ट अंगणवाडी किट खरेदी करण्यास शासन निर्णय दिनांक ९/०१/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली. सदर निविदेतील दर पुढील २ वर्ष कालावधीसाठी (सन २०२५-२६ व २०२६-२७) लागू करण्यात आले होते.

त्यानुसार वरीलप्रमाणे मंजूर दर प्रति संच रुपये १,६४,५६०/- प्रमाणे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता सदर योजनेकरीता मंजूर असलेली तरतुद विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक २८/१०/२०२५ अन्वये L१ निविदाधारक मे. गुनिना कमर्शियल प्रा. लि. यांचेकडून ५४६९ अंगणवाडी केंद्रांकरीता स्मार्ट अंगणवाडी किट खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

आदर्श अंगणवाडी योजनेतंर्गत स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांना स्मार्ट अंगणवाडी किट उपलब्ध करुन देण्यात येते. स्मार्ट अंगणवाडी किटमध्ये ई-लर्निंग-टिव्ही व पेन ड्राईव्ह (हार्डवेअर/ सॉफ्टवेअर), स्वच्छ भारत किट, ऑफलाईन वॉटर प्युरिफायर, हँडवॉश बेसीन फॅसिलिटी, अंगणवाडी इमारतीची रंगरंगोटी, अंगणवाडी इमारतीची किरकोळ दुरुस्ती (देखभाल दुरुस्ती, रेन वॉटर हार्वेस्टींग इ.), स्वयंपाकगृहाचे आधुनिकीकरण इ. साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत असल्यामुळे अंगणवाडी सेविकांमार्फत हाताळणी करणे सोपे आहे.

राज्यातील जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास), जिल्हा परिषद व बालविकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/आदिवासी व नागरी) यांचेकडून स्मार्ट अंगणवाडी किटच्या वापराबाबत अंगणवाडी सेविकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धामणदे (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४) * ७७०४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणदे (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत सन २०२०-२१ ते २०२४-२५ अखेर कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि गैरव्यवहार झालेला असून येथील लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांच्याकडे याबाबत दिनांक ६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती धामणदे ग्रुप ग्रामपंचायतीच्या निधीमध्ये गैरव्यवहार प्रकरणी आढळून आलेल्या दोषींवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी गट विकास अधिकारी, मुक्ताईनगर यांनी प्राथमिक चौकशी केली आहे. प्राथमिक चौकशीमध्ये काही अनियमितता आढळून आलेल्या आहेत. त्यानुषंगाने सखोल चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ येथील 'पीएम-मित्र मेगा टेक्सटाईल पार्क' प्रकल्पाच्या अंमलबजावणीत विलंब होत असल्याबाबत

**(५) * ७६८५ श्री.संजय खोडके, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील सात मेगा टेक्सटाईल पार्कपैकी एक वस्त्रोद्योग उद्यान अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ औद्योगिक वसाहतीत सुमारे १,०२० एकर जमिनीवर ‘पीएम-मित्र मेगा टेक्सटाईल पार्क’ विकसित करण्याची घोषणा माहे मार्च, २०२३ मध्ये करण्यात आली असून, सदर प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत विकसित करण्यात येणार असल्याने सदर प्रकल्पासाठी भूसंपादन, अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा, पाणी, सांडपाणी प्रक्रिया, ड्रेनेज व लॉजिस्टिक सुविधा वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे व सदर प्रकल्पाकरीता पायाभूत सुविधांची कामे अपुरी राहिल्यामुळे प्रकल्पासाठी मंजूर केलेला केंद्र व राज्य शासनाचा निधी वापरात न आल्याने शासकीय निधीचा अप्रत्यक्षरित्या अपव्यय होत असल्याच्या तक्रारी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०२३ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या प्रकल्पासाठी १०२० एकर जागा निश्चित करण्यात आली असून सुमारे १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक, पश्चिम विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ आणि तीन लाख रोजगारांच्या संधीची निर्मिती होणार आहे, अशी आश्वासने यावेळी देण्यात आली असून “फार्म टू फायबर टू फॅक्टरी टू फॅशन टू फॉरेन (फाइव्ह एफ) या संकल्पनेवर आधारीत हा प्रकल्प नांदगांपेठजवळील पिंपळविहीर परिसरात साकार होणार असून या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ७०० कोटी रुपयांचा निधी देण्याचे निश्चित करण्यात आले असताना त्याबाबतचा निधी अद्याप अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टेक्सटाईल पार्कमध्ये प्रस्तावित असलेले सूत कातरणे, विणकाम, प्रक्रिया व रेडीमेड वस्त्रनिर्मिती उद्योग स्थापनेस विलंब होत असल्यामुळे अमरावती व विदर्भातील स्थानिक युवक-युवतींना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधींवर प्रतिकूल परिणाम होत असून अपेक्षित रोजगार निर्मितीस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती येथील वस्त्रोद्योग उद्यानासाठी खरेदी केलेल्या जमिनीची किंमत इतर सहा राज्यांतील मेगा टेक्सटाईल पार्कसाठी खरेदी केलेल्या जमिनींच्या किंमतींपेक्षा जास्त असल्याने उद्योजक या प्रकल्पात गुंतवणूक करण्यास उत्सुक नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीत झालेल्या विलंबाच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व इतर राज्यांप्रमाणे अमरावती येथील ‘पीएम-मित्र मेगा टेक्सटाईल पार्क’साठी विशेष सवलती, दरकपात किंवा अतिरिक्त प्रोत्साहन योजना देऊन सदर ‘पीएम-मित्र मेगा टेक्सटाईल पार्क’ प्रकल्प ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

पी.एम.मित्रा पार्क चे एकूण क्षेत्रफळ १०२० एकर इतके असून त्यामध्ये ६२० एकर क्षेत्रफळावर लहान मोठ्या आकाराच्या एकूण ३९ भूखंडांचे आरेखन करण्यात आले असून भूखंड वाटप प्रक्रिया सुरु आहे.

सदर पार्क करीता सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित असून प्राथमिक पायाभूत सोईसुविधांची रुपये १११७६.७६ लक्ष इतक्या रकमेची कामे प्रगतीपथावर असून रस्ते, जलवितरीका, पथदिवे, सांडपाणी वाहीनी इत्यादींचा समावेश आहे.

प्रकल्प अहवालानुसार पुढील सोईसुविधांचे कामाकरीता जसे की प्लग अन्ड प्ले सुविधा, कमान्ड अन्ड कन्ट्रोल सेंटर, प्रशासकीय इमारत, वृक्षारोपण व सौंदर्याकरण इत्यादी करीता रुपये १७४४०.८७ लक्ष इतक्या रकमेची निविदा प्रकाशीत करण्यात आलेली असून लवकरच काम हाती घेण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडून पी.एम. मित्रा पार्क अमरावती प्रकल्प दिनांक १७/०३/२०२३ रोजी मंजूर करण्यात आला असून प्रकल्पाकरीता २००.०० कोटी इतका निधी कामाच्या प्रगतीनूसार वर्ग करण्यात येणार आहे. त्यानुसार प्रकल्पाकरीता झालेल्या खर्चाच्या आधारे केंद्र शासनाने रुपये ३०.०० कोटी इतका निधी दिनांक १८/१२/२०२५ रोजी म.औ.वि. महामंडळाकडे वर्ग करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून २०० कोटी रुपयांचा निधी देण्याचे निश्चित करण्यात आले असून त्यापैकी रुपये ३०.०० कोटी निधी प्राप्त झालेला आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

सदर पार्क करीता भूखंडाचा दर रुपये १५८०/- प्रती चौ.मी (रुपये १४७/- प्रती चौ. फुट) निर्धारीत केला होता.परंतु तदनंतर उद्योगांना चालना देण्यासाठी साठी सदर दर रुपये ५९०/- प्रती चौ.मी. (रुपये ५५/- प्रती चौ. फूट) इतका करण्यात आला असून, तो इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात कमी आहे. सदर प्रकल्प म.औ.वि. महामंडळाच्या मिलाप प्रणालीवर वाटपास उपलब्ध आहेत.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ व बालरोगतज्ज्ञ यांची नियुक्ती करण्याबाबत

**(६) * ६५७६ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके, श्री.एकनाथराव खडसे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटात (जि.अमरावती) आदिवासींना अनेक आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागत असून कालमखार, बैरागड, सादराबादी, धुळघाट रेल्वे, हातरु या भागांमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ आणि बालरोगतज्ज्ञ नसल्याने माता व बालमृत्यूंचे प्रमाण अधिक असल्याचे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ व बालरोग तज्ज्ञांअभावी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान चार मुले व दोन मातांचे निधन झाले असून धारणी (मेळघाट) उपजिल्हा रुग्णालयात एका गर्भवती महिलेसह दोन बालकांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली असून मेळघाटात गेल्या पाच महिन्यांत ६५ बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हतरू येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, कंपाउंडर, संगणक परिचालक हे कर्मचारी नियमित उपस्थित राहत नसल्याचे तसेच येथील बहुतांश आरोग्य केंद्रामध्ये पुरेशी औषधे देखील उपलब्ध नसल्याने दवाखाने व फिरते पथक अनेक महिन्यांपासून बंद असल्याची बाब दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकताई आयुर्वेद येथील उपकेंद्राला इमारत तसेच अन्य सुविधा व साधनसामग्री उपलब्ध आहेत परंतु वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नसल्याने हे उपकेंद्र गत सात वर्षांपासून बंद असून या परिसरातील फिरते पथकही बंद असल्याने येथील आदिवासी मध्य प्रदेशातील खेड्यांमध्ये उपचार देणाऱ्या कथित बंगाली डॉक्टरांकडे जाऊन उपचार घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि मेळघाटातील आदिवासी पाड्यातील सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ आणि बालरोगतज्ज्ञ यांची नियुक्त करून, आवश्यक मनुष्यबळ व औषधसाठा उपलब्ध करुन उक्त आरोग्य केंद्रे कार्यान्वित ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंजूर आकृतीबंधानुसार उपकेंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता तज्ज्ञांची पदे अनुज्ञेय नाहीत. उपजिल्हा रुग्णालय, ग्रामिण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय इत्यादी रुग्णालयाकरीता तज्ज्ञांची पदे अनुज्ञेय आहेत. तथापि, मेळघाट भागातील ग्रामिण रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरसुद्धा दिनांक २५ डिसेंबर, २०२३ पासून स्त्रीरोग व बालरोग तज्ज्ञांची सेवा चक्राकार पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येत होती. त्याचप्रमाणे उपजिल्हा रुग्णालय व ग्रामिण रुग्णालय स्तरावर तज्ञांची सेवा सुरु आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता दिनांक १९/१२/२०२५ पासून पाच प्राथमिक आरोग्य केंद्रावर सुद्धा दररोज स्त्रीरोग व बालरोग तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दिनांक १५/११/२०२५ रोजी मौजे सालईबर्डी येथील मातेचा उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे तसेच दिनांक १९/११/२०२५ रोजी मौजे खटकाली येथील मातेचा जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे मृत्यू झाला आहे. तसेच दिनांक १५/११/२०२५ रोजी उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे दोन बालकांचा मृत्यू झाला आहे.

मेळघाटमध्ये माहे जुलै ते नोव्हेंबर २०२५ या पाच महिन्याच्या कालवधीत विविध आजारांमुळे एकूण ७७ बालकांचा मृत्यू झाला आहे.
(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र हतरु अंतर्गत एकताई येथे आयुर्वेदिक दवाखाना आहे. सदर दवाखान्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. परंतु काही वैद्यकीय अधिकारी या ठिकाणी रुजू होत नव्हते व काही वैद्यकीय अधिकारी रुजू झाल्यानंतर अनधिकृत गैरहजर राहत होते. तथापि, दिनांक २४/११/२०२५ पासून वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून नियमितपणे आरोग्य सेवा पुरवित आहेत. तसेच उपचाराकरीता आवश्यक औषधी साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र हतरु अंतर्गत कोणतेही फिरते पथक कार्यरत नाही. एकताई येथे आयुर्वेद दवाखाना कार्यरत आहे व रुइपठार येथे भरारी पथक कार्यरत आहे. भरारी पथकातील मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत ५ गावांना आरोग्य सेवा पुरविण्यात येते.
(३) हे अंशत: खरे आहे.

आयुर्वेदीक दवाखाना एकताई, येथे वैद्यकीय अधिकारी, गट-ब दर्जाचे अस्थाई वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते. त्यांचे नियमित मध्ये समावेशन झाल्यामुळे या आयुर्वेदीक दवाखान्यामध्ये समुपदेशनाद्वारे दिनांक २२/०७/२०१९ रोजी वैद्यकीय अधिकाऱ्याची पदस्थापना करण्यात आली होती. परंतु संबंधित वैद्यकीय अधिकारी हे अनधिकृतरित्या गैरहजर असल्याने त्यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर रिक्त पद भरण्याची कार्यवाही करण्यात येत असून सदर पदावर मानसेवी वैद्यकीय अधिकारी, भरारी पथक, रुईपठार यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात या दवाखान्यासाठी अधिगृहीत करण्यात आल्या होत्या.

सद्य:स्थितीत समुपदेशनाने दिनांक २४/११/२०२५ पासून सदर पदावर नियमित वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असून आरोग्य सेवा सुरळीत सुरु आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र हतरु अंतर्गत कोणतेही फिरते पथक कार्यरत नाही. तसेच मध्यप्रदेशातील कथित बंगाली वैद्याकडून उपचार घेणे याबाबत कोणतीही तक्रार अथवा माहिती प्राप्त नाही.

(४) वर नमूद मातामृत्यू प्रकरणी जिल्हास्तरीय समिती मार्फत चौकशी करण्यात आली असून कर्तव्यावर कसूर केलेल्या स्त्रीरोग तज्ज्ञांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय अधीक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच मेळघाट परिसरातील आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | तालुका आरोग्य अधिकारी | ०२ | ०१ | ०१ |
| २ | वैद्यकीय अधिकारी गट-अ | १४ | १४ | ० |
| ३ | वैद्यकीय अधिकारी गट-ब | २७ | २७ | ० |
| ४ | आरोग्य सहायक (राज्य) | ७ | ७ | ० |
| ५ | आरोग्य सहायक (जि.प.) | १७ | १५ | २ |
| ६ | आरोग्य सहायिका | १७ | १६ | १ |
| ७ | आरोग्य सेविका<br>(नियमित-७१ प्रतिनियुक्तीने-६३) | १३४ | १३४ | ० |
| ८ | आरोग्य सेवक (राज्य) | ३४ | ११ | २३ |
| ९ | आरोग्य सेवक (जि.प.) | ७२ | ६७ | ४ |
| १० | औषधी निर्माता | १८ | १८ | ० |
| ११ | प्रयोगशाळा तंत्रण | १३ | १२ | १ |
| १२ | कनिष्ठ लिपिक | ११ | ११ | ० |
| १३ | मानसेवी वैद्यकीय अधिकारी | २२ | २२ | ० |
| १४ | समुदाय आरोग्य अधिकारी<br>(नियमित-५२ प्रतिनियुक्तीने-२९) | ८१ | ८१ | ० |
| १५ | गटप्रवर्तिका | ४० | ४० | ० |
| १६ | आशा | ४२४ | ४१४ | १० |

मेळघाट क्षेत्रातील बहुतांश पदे भरलेली आहेत तसेच उपचाराकरीता आवश्यक औषधी साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरुन रुग्णालयाची नवीन इमारत कार्यान्वित करण्याबाबत

**(७) * ६७८६ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिमायतनगर (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आलेला असतानाही अपुरे मनुष्यबळ, वैद्यकीय तपासणीसाठीची बंद उपकरणे यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना जागा अपुरी पडत असल्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेली नवीन इमारत रुग्णालय प्रशासनाच्या ताब्यात देण्यात न आल्यामुळे तसेच सदर रुग्णालयाकरीता लाखो रुपये खर्च करुन खरेदी करण्यात आलेले डिजिटल एक्सरे, सोनोग्राफी, ई.सी.जी. यासाठीच्या मशिन्स सद्य:स्थितीत विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन उक्त रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होऊ नये व त्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच नवीन इमारत रुग्णालय प्रशासनाकडे देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालय, हिमायतनगर येथील X-Ray मशीन, सोनोग्राफी, ई.सी.जी. इत्यादी मशीनचा वापर रुग्ण सेवेसाठी करण्यात येत असून सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या चाचण्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | X-Ray | USG | ECG |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ५९० | ३२५ | १६४२ |
| २०२३-२४ | ५४५ | २६६ | १३२० |
| २०२४-२५ | ५८९ | ३५८ | १२०९ |

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रुग्णालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन इमारतीचा ताबा दिनांक २७/१२/२०२५ रोजी आरोग्य विभागाकडे घेण्यात आला असून रुग्णसेवेसाठी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीद्वारे ३ तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये सुवाह्य एम.आर.आय. प्रणाली बसविण्याबाबत

**(८) * ७१५० श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॅग्नेटिक रिझोनन्स इमेजिंग (MRI) हे मेंदू विकार, अपघात, स्ट्रोक आणि इतर गुंतागुंतीच्या रोगांचे निदान आणि निरीक्षण करण्यासाठी अत्यंत आवश्यक असून, सध्या वापरात असलेल्या पारंपारिक एम.आर.आय. प्रणाली जड आणि स्थिर असून ती वापरण्यासाठी विशेष यंत्रणा आवश्यक असल्यामुळे अतिदक्षता विभागातील, हालचाल करू न शकणाऱ्या रुग्णांना किंवा ग्रामीण भागातील रुग्णांना एम.आर.आय. सुविधा उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपत्कालीन आणि न्यूरोक्रिटिकल केअर युनिट्स तसेच सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये आणि तृतीय स्तरीय केंद्रांमध्ये पोर्टेबल MRI यंत्रणा प्राधान्याने बसविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आरोग्य विभागाच्या पायाभूत सुविधांचा दर्जा उंचाविण्यासाठी शासकीय वैद्यकीय संस्थांमध्ये पोर्टेबल एम.आर.आय. प्रणालींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

विभागाच्या अधिनस्त १९ संस्थांमध्ये एम.आर.आय. सुविधा सद्य:स्थितीत उपलब्ध आहे. तसेच खाजगी भागीदारी (पीपीपी) धोरणा अंतर्गत एकूण १४ संस्थामध्ये एम.आर.आय. सुविधा घेण्याकरीता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) सदर पोर्टेबल एम.आर.आय. यंत्रणा प्राधान्याने बसवणे आवश्यक असल्याची बाब खरी नाही.

(३) विभागाच्या अधिनस्त १९ संस्थांमध्ये एम.आर.आय. सुविधा सद्य:स्थितीत उपलब्ध आहे. तसेच राज्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय स्थापन करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) धोरण निश्चित केले आहे.

त्याअंतर्गत मुंबई क्लस्टर अंतर्गत ०९ संस्था तसेच नागपूर क्लस्टर अंतर्गत ०५ असे एकूण १४ संस्थामध्ये बाह्यस्त्रोतामार्फत एम.आर.आय. सुविधा घेण्याकरीता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय कर्मचारी व शिक्षकांसाठीच्या कॅशलेस वैद्यकीय सुविधेकरीता ऑनलाईन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(९) * ६६७६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचारी आणि शिक्षकांसाठी कॅशलेस वैद्यकीय सुविधा देण्याची घोषणा शासनाने माहे जुलै, २०२५ मध्ये केली असून सदर योजनेची अद्याप पूर्णतः अंमलबजावणी झालेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ लाख रुपयांहून अधिक रकमेच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती करण्यासाठी सुलभ अशी ऑनलाईन यंत्रणा उभी करण्याचे शासनाने मान्य करूनही सदर यंत्रणा अद्याप कार्यान्वित न झाल्याने वैद्यकीय देयकांच्या प्रतिपूर्तीसाठी (Reimbursement) कर्मचाऱ्यांना प्रशासकीय स्तरावर अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर सुविधेच्या अंमलबजावणीत होणाऱ्या विलंबाबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व कॅशलेस वैद्यकीय सुविधा देण्याकरीता पूर्णतः ऑनलाईन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

विभागाच्या दिनांक २८/०७/२०२३ शासन निर्णय नुसार राज्यातील अधिवासी असणाऱ्या सर्वच नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये ५ लक्ष पर्यंत कॅशलेस उपचार अनुज्ञेय आहे. सदर योजनेच्या लाभार्थायांमध्ये शासकीय कर्मचारी आणि शिक्षक यांचाही समावेश आहे.
(३) याविषयी मा.मंत्री, सार्वजननिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०९/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांचे थकित वेतन अदा करण्याबाबत

**(१०) * ७१३० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, श्री.संजय केणेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एनटीसीच्या चार गिरण्यांसह देशातील एकूण २३ गिरण्या कोविड मधील लॉकडाऊनच्या कालावधीत बंद करण्यात आल्या असून लॉकडाऊन संपल्यानंतरही सदरहू गिरण्या अद्याप सुरू करण्यात आल्या नसल्याने कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील बंद असलेल्या एनटीसीच्या (National Textile Corporation Limited) गिरण्या सुरु करून येथील कामगारांना मागील नऊ महिन्यांचा थकित वेतन तसेच अन्य थकीत देणी विनाविलंब देण्याची मागणी त्यांचेकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामगारांना पूर्ण वेतन देण्याचा निर्णय मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी देऊनही त्याची अंमलबजावणी एनटीसीच्या गिरण्यांमार्फत होत नसल्याने मुंबईतील कामगारांनी आंदोलनाचाही इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील बंद एनटीसी गिरण्या त्वरित सुरु करुन कामगारांचा नऊ महिन्यांचे वेतन तसेच थकित देणी तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१), (२) व (३) हे खरे आहे. पण अशा स्वरूपाची तक्रार/निवेदन डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास कामगार विभागास प्राप्त झालेले नाही.

दिनांक ३०/०१/२०२५ रोजीच्या वर्तमान पत्रात "गिरणी कामगार वेतनाविना" अशा आशयाची बातमी प्रकाशित करण्यात आली होती. त्यामध्ये एनटीसीच्या मुंबईतील ४, तर राज्यातील ६ गिरण्या कोविडचे कारण पुढे करून बंद केल्याबाबत व सदर गिरण्यामधील कामगारांचे पगार थकविल्याबाबत राष्ट्रीय मिल मजदूर संघ या संघटनेने ठिय्या आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे नमूद केलेले होते. तथापि, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ लि. (National Textile Corporation Limited) हा केंद्र शासनाचा अधिकृत उपक्रम असून एनटीसी मिलबाबत केंद्र शासन हे समूचित शासन आहे. त्यामुळे एनटीसी मिल मधील कामगारांचे थकीत वेतन व अन्य देणी मिळणेबाबत राज्य शासनाच्या कामगार विभागाकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांना सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतनासह अन्य लाभ मिळत नसल्याबाबत

**(११) * ६९३४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन नियंत्रित सुरक्षा रक्षक मंडळाच्या (रोजगार व कल्याण नियमन, १९८१) सानपाडा-वाशी–ठाणे या कार्यालयामार्फत विविध आस्थापनांमध्ये मागील २५ ते ३० वर्षांपासून कार्यरत असलेल्या २४००० सुरक्षा रक्षकांना सेवानिवृत्त झाल्यानंतर निवृत्तीवेतन, मानधन, प्रोत्साहन भत्ता इ. लाभ मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व सुरक्षा रक्षक मंडळाचा अंशदायी भविष्य निर्वाह निधी केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्थेकडे हस्तांतरित करण्याच्या शिफारसीनुसार राज्य शासनाने केंद्र शासनाकडे सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ प्रमाणे ८ टक्के निधी जमा न केल्याने तर ईपीएस १९९५ च्या कायदयानुसार सुरक्षा रक्षकांना निवृत्तीवेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय कर अधिनियम १९७५ नुसार मंडळ कामगारांच्या वेतनातून रुपये २००/- कपात करून शासनास कर भरत असतानाही निवृत्त सुरक्षा रक्षकांना निवृत्तीवेतन योजनेपासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, मा.कामगार मंत्री महोदयांनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी बांधकाम कामगार यांना निवृत्तीवेतन योजना सुरु करण्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून सुरक्षा रक्षकांना निवृत्तीवेतन योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१), (२) व (३) सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई-ठाणे जिल्हा या कार्यालयात एकूण २२५०७ एवढे सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत. सदरहु कार्यालय तसेच राज्यातील इतर सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांची सेवा ५८ वर्षांपर्यंत सुरु राहते. या सुरक्षा रक्षकांना सेवानिवृती वेतन योजना लागू नाही, हे खरे आहे.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक योजना २००२ मध्ये सुरक्षा रक्षकांसाठी मंडळाची अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना तयार केली असून ती १९८१ पासून लागु केली आहे. यासाठी सुरक्षा रक्षकांच्या वेतनातुन आवश्यक हिस्सा मंडळ जमा करते. सदर सुरक्षा रक्षकांची सेवा संपुष्टात आल्यानंतर मंडळाचा हिस्सा तसेच नोंदीत सुरक्षा रक्षकांचा हिस्सा संबंधित सुरक्षा रक्षकास व्याजासह अदा करण्यात येतो.

याप्रकरणी आयुक्त, भविष्य निर्वाह निधी यांनी त्यांच्या कायद्याच्या तरतुदी सुरक्षा रक्षक मंडळास लागू करण्यासंदर्भात सन १९८६ मध्ये कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्याविरुध्द बृहन्मुंबई-ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत मा.उच्च न्यायालयाने सदर कारणे दाखवा नोटीस रद्द करुन पुढिल कार्यवाही करण्यास प्रतिबंध केला होता.त्यामुळे भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने सदरहू कार्यवाही बंद केली होती.

(४) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दिनांक २८/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर निर्णय लागू करण्यात आलेला आहे.

(५) सुरक्षा रक्षक मंडळातर्फे शासनास भरण्यात येणारा व्यवसाय कर व भविष्य निर्वाह निधी तसेच सेवानिवृत्ती वेतन लागु करणे या बाबी एकमेकाशी संबंधित नाहीत. परंतु सदरहु सुरक्षा रक्षक हे जरी सुरक्षा रक्षक मंडळामार्फ़त नोंदीत करण्यात आले असले तरी ते विविध आस्थापनेवर काम करत असून त्यांना सुरक्षा रक्षक अधिनियमांतर्गत असलेल्या नोकरीच्या अटी व शर्ती तसेच विविध कल्याणकारी लाभ दिले जातात. त्यांच्या सेवा या शासकीय अथवा निम शासकीय सेवा समजल्या जात नाहीत. त्यामुळे त्यांना सेवानिवृत्ती वेतन देय नाही.त्याऐवजी त्यांना भविष्य निर्वाह निधीची संपूर्ण रक्कम अदा केली जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उपळी (ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१२) * ७६०८ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपळी (ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याची तात्काळ दुरुस्ती करून संरक्षण भिंत उभारण्यात यावी, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी तसेच रयत क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे सदर बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात कचरा साचला असून अतिवृष्टीदरम्यान बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंचे संरक्षण भाग वाहून गेल्याने लगतच्या शेतांमध्ये पाणी शिरून दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यात आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे भविष्यातील होणारे नुकसान टाळण्यासाठी सदर कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्ती करून व संरक्षण भिंत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

ऑगस्ट, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात कचरा अडकल्यामुळे बंधाऱ्याच्या डाव्या तिरावरील संरक्षण भाग वाहून गेल्यामुळे लगतच्या शेतीचे नुकसान झाले आहे.
(३) शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्याकरीता सदर काम सन २०२५-२६ आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या योजनांमध्ये समाविष्ट करण्यात आले असून निधी उपलब्धतेनुसार बंधारा दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील खाजगी कंपन्यांतील गिग कामगारांना कायदेशीर संरक्षण व विविध सोयी-सुविधा देऊन प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१३) * ६७२८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील इन्स्टा, ब्लिंकिट, झोमॅटो, स्विगी, झेप्टो या कॉमर्स कंपन्यातील सुमारे १० हजार डिलिव्हरी बॉय (गिग वर्कर) यांनी सातत्याने मिळणारा कमी मोबदला, विमा सुरक्षेचा अभाव, नोकरीची हमी नसल्यामुळे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास संप केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामगारांच्या संघटनांनी केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये १० मिनिटांत डिलिव्हरी सिस्टीम वर बंदी आणावी, १० मिनिटांच्या मर्यादेमुळे रायडर्सना खराब रस्ते, खड्डे आणि गर्दीतून जीवघेणी कसरत करावी लागत असून त्यांचे अपघात होण्याची शक्यता जास्त आहेत तसेच वेळेत डिलिव्हरी न दिल्याने त्यांना खराब रेटींग, सुपरवायझर यांनी अरेरावी करणे व त्यामुळे आर्थिक नुकसान सोसावे लागत असणे त्यामुळे त्यांना डार्क स्टोअर मध्ये किमान सुविधा व अपघात विमा संरक्षण देण्याबाबत तसेच कामावरून कमी करण्याचा निर्णय एकतर्फी घेण्यात घेऊ नये इ. समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर कामगारांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा २०२० (Social Security Code, २०२०) दिनांक २९/०९/२०२० रोजी अधिसूचित केली असून, दिनांक २१/११/२०२५ पासून या संहितेची अंमलबजावणी करण्याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

त्यानुसार सामाजिक सुरक्षा संहिता २०२०, देशातील गिग कामगार (गिग वर्कर), प्लॅटफॉर्म कामगार व असंघटित कामगारांना लागू आहे.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० नुसार गिग कामगार, प्लॅटफॉर्म कामगार या असंघटित क्षेत्रातील कामगारांकरीता विविध सामाजिक तसेच कल्याणकारी योजना लागू करण्याकरीता कल्याणकारी मंडळ गठीत करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत सामाजिक सुरक्षा संहितेमध्ये, राज्याचे नियम प्रसिध्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोबरवाही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (ता.तुमसर, जि.भंडारा) कार्यान्वित करण्याबाबत

**(१४) * ६६९९ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोबरवाही प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे (ता.तुमसर, जि.भंडारा) काम २५ वर्षांनंतरही अपूर्णावस्थेत असल्याने सदर योजनेतंर्गत ६ गावांना आजही शुध्द पाणीपुरवठा उपलब्ध होत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी सितेकसा (ता.तुमसर) येथून आणलेल्या पाणी शुद्धीकरण प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याने गोबरवाही, सितासावंगी, चिखला, राजापूर, नाकाडोंगरी व सुंदरटोला या गावांना आजही ४५ वर्षे जुन्या व जीर्ण योजनेतून दूषित व रसायनयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून या योजनेत लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या पाण्याच्या टाक्या व जलवाहिन्यांचा वापर होत नसल्याने शासकीय निधीचा अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील अडीच ते तीन वर्षांपासून प्रशासनाकडे (जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग) मागणी करूनही सदर योजनेकडे हेतुपरस्पर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप येथील स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गोबरवाही प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच उभारलेल्या पाण्याच्या टाक्या व जलवाहिन्यांचा वापर होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) गोबरवाही प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम (२२ गांवे / वाड्या) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात येऊन सन २०१४ मध्ये योजना कार्यान्वित करण्यात आली.

दरम्यान, प्रती माणसी ५५ एलपीसीडीने पाणीपुरवठा करण्याकरीता जल जीवन मिशन अंतर्गत गोबरवाही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना रेट्रोफिटींग अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत घेण्यात आली आहेत. उर्वरित गोबरवाही, सितासावंगी, चिखला, राजापूर, नाकाडोंगरी व सुंदरटोला या ०६ गावांनी ठराव न दिल्याने सदर गावांना जिल्हा परिषदेमार्फत बावनथडी नदी पात्रातील विहीरीव्दारे शुध्द व नियमित पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४) गोबरवाही प्रादेशिक योजनेची जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रेट्रोफिटींगची संपूर्ण कामें महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत पूर्ण होवून योजनचे ट्रायल रन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर योजना जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील महिला व बाल रुग्णालयाचे काम अपूर्णावस्थेत असल्याने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) * ६६७२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे सन २०१३ मध्ये ४०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता व त्यानुसार दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजी रुपये १११ कोटींची मूळ प्रशासकीय मान्यता व तद्नंतर रुपये १८९ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता शासनाने दिली परंतू वाढीव निधी न मिळाल्याने मागील सहा वर्षांपासून सदर रुग्णालयाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधीअभावी तळमजला, सहा मजली इमारतीचे काम, विद्युत ट्रान्सफॉर्मर, उद्वाहक, ऑपरेशन थिएटर, अतिदक्षता विभागासह तांत्रिक कामे अपूर्ण असल्याने सदर कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा ७८ कोटी रुपयांचा निधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर येथे २०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय स्थापन करण्यास शासन निर्णय, दिनांक १७/०१/२०१३ अन्वये मान्यता देवून रुग्णालय बांधकामासाठी रुपये १११.८९ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय दिनांक २०/०९/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. दरम्यान सन २०२१ मध्ये याच रुग्णालय इमारतीच्या ५ व्या व ६ व्या माळयावर अतिरिक्त २०० खाटांचे महिला व नवजात शिशू रुग्णालयाच्या कामास राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मान्यता देण्यात आली. त्यामुळे छ. संभाजीनगर महिला व बाल रुग्णालय २०० ऐवजी ४०० खाटांचे झाले.

रुग्णालय बांधकामाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेशिवाय अतिरिक्त २०० खाटांच्या रुग्णालयाच्या अनुषंगाने इमारतीच्या मूळ आंतरिक आराखड्यात मोठे बदल झाले. सबब, आराखड्यातील मूळ तांत्रिक बदलामुळे खर्चात वाढ झाली.

सदर अतिरिक्त दोन मजल्याच्या वाढीव कामासाठी लागणाऱ्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव दिनांक ०९/१०/२०२४ रोजी प्राप्त झाला असून प्रस्तावाची तांत्रिक तपासणी होऊन प्रशासकीय मान्यतेची बाब अंतिम टप्प्यात आहे.

आजमितीस मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार रुग्णालय बांधकामासाठी संपूर्ण निधी शासनाने वर्ग केला आहे. सद्य:स्थितीत सदर इमारतीचे ९० टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या समतानगर (कांदिवली) येथील इमारतीच्या पुनर्विकास प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * ६६१५ श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समतानगर, कांदिवली (मुंबई) येथील महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या दोन कर्मचारी वसाहत इमारतींचा पुनर्विकास 'एस. डी. कॉर्पोरेशन' या खाजगी विकासकाकडून करण्यात आला असून या पुनर्विकसित झालेल्या इमारतीत महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी बेकायदेशीररित्या वास्तव्य करीत असल्याची बाब दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी वसाहतींच्या पुनर्विकास प्रक्रियेदरम्यान विकासकाशी संगनमत करून विकासकाकडून तसेच महामंडळाला फसवून महामंडळाकडून देखील घरभाड्यापोटी लाखो रुपये वसूल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ मध्ये झालेल्या कराराचा भंग करून संबंधित विकासकाने पुनर्रचित इमारतीतील ४० सदनिका महामंडळाला देण्याऐवजी संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बेकायदेशीररित्या वास्तव्याकरिता दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाची पर्यायाने शासनाची फसवणूक करणाऱ्या महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवर तसेच संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

समतानगर, कांदिवली (मुंबई) येथील महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कर्मचारी वसाहत इमारतीचा पुनर्विकास करणाऱ्या 'एस. डी. कॉर्पोरेशन' या विकासकाकडून दिनांक १८/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर बाब महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास कळविण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी नियुक्त केलेल्या लवादापुढे दिनांक ३१/०१/२०२४ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान विकासकाने सादर केलेल्या दस्तऐवजानुसार, विकासकाने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या ८ कर्मचाऱ्यांना भाड्यापोटी तसेच अनामत रक्कम व इतर खर्चासाठी एकूण रुपये ८८ लक्ष रक्कम दिली आहे. तसेच उक्त ८ कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचाऱ्यांनी दिनांक ०१/०४/२०१९ पासून घरभाडे भत्त्यापोटी महामंडळाकडून एकूण रुपये १२.४५ लक्ष इतकी रक्कम घेतली आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

विकासकाने ४० सदनिकांपैकी ८ सदनिका महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना बेकायदेशीररित्या वास्तव्याकरीता दिलेल्या आहेत. तसेच उर्वरित सदनिकांचा ताबा विकासकाने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास अद्यापपर्यंत दिलेला नाही.

(४) • महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने दिनांक २१/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर पुनर्विकास करार रद्द केल्याबाबत विकासकास कळविले होते. तसेच महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने दिनांक ३०/०५/२०२३ रोजी सदर विकासकास नोटीस पाठविली होती. तथापि, त्यास विकासकाने प्रतिसाद दिला नाही. म्हणून महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने सदर विकासकाच्या विरोधात दिनांक ०६/०७/२०२३ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला होता.त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयाकडून दिनांक ०१/०९/२०२३ रोजी मा.श्री.आर.डी.धनुका, निवृत्त माजी मुख्य न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची लवाद म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

• सदर प्रकरणाबाबत लवादापुढे सुनावणी चालू असतानाच म्हाडाच्या मध्यस्थीने समझोता करण्यात आला व त्यासाठी दिनांक २१/०६/२०२५ रोजी संमती करार करण्यात आला. सदर संमती करारानुसार, विकासकाने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास ४० सदनिकांव्यतिरिक्त ६५० चौ.फुट चटई क्षेत्रफळ असलेल्या अतिरिक्त १२ सदनिका पुढील पाच वर्षांत देण्याचे मान्य केले. तसेच जर विकासक पाच वर्षाच्या कालावधीत अतिरिक्त १२ सदनिका देऊ शकला नाही तर आणखी एक अतिरिक्त सदनिका देण्याचे विकासकाने मान्य केले आहे.

• सदर संमती करार झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेल्या ८ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना विकासकाकडून मिळालेली रक्कम परत करण्यासाठी वकिलामार्फत नोटीस पाठविली आहे. तथापि, महामंडळाने पाठविलेल्या नोटीसीला उत्तर न आल्याने महामंडळाने उक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १७३ अन्वये दिनांक ०५/१२/२०२५ रोजी समतानगर पोलीस स्टेशन, कांदिवली पुर्व येथे प्रथम खबर अहवाल (FIR) दाखल केला आहे. तसेच महामंडळाने उक्त सेवानिवृत्त कर्मचारी यांचे विरोधात रक्कम वसूलीसाठी दिवाणी न्यायालयात वसूली दावा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.

• दिनांक २१/०६/२०२५ रोजीच्या संमती करारनाम्याच्या अटीचा भंग केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने विकासकाच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यासाठी महामंडळाने विधिज्ञाची नेमणूक केली आहे. तसेच महामंडळाने सदर विकासकाच्या विरोधात रिअल इस्टेट नियामक प्राधिकरणास (रेरा) नियमानुरुप कारवाई करण्यासाठी दिनांक ०५/०१/२०२६ रोजीच्या पत्राव्दारे विनंती केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील मुलींच्या वसतिगृहातील रॅगिंगच्या घटनेची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * ७२१० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील मुलींच्या वसतिगृहात मागील महिन्यात रात्री १० वाजेनंतर नवीन विद्यार्थिनींना अपमानकारक कामे करण्यास भाग पाडले जाणे, त्यांना मानसिक त्रास देणे अशा प्रकारची रँगिंगची घटना वरिष्ठ विद्यार्थिनींकडून दोन वेळा झाल्यामुळे नवीन विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास सदर प्रकार वेळीच न आल्यामुळे विद्यार्थिनींना थेट केंद्रीय रॅगिंग समितीकडे तक्रार करावी लागली असून, यामुळे शासकीय संस्थेतील अंतर्गत देखरेख यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने अँटी रॅगिंग समितीमार्फत सुरू असलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय हे खरे आहे.

(२) नाही.

सदर विद्यार्थिनींनी केंद्रीय रॅगिंग समितीकडे तक्रार केली नसून ही तक्रार शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय नागपूर यांचेकडे केली आहे. सदर महाविद्यालयाने या तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही केली आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाविद्यालयस्तरीय अँटी रॅगिंग समितीमार्फत चौकशी करण्यात आली. अँटी रॅगिंग समितीच्या अहवालानुसार दोषी आढळलेल्या १९ मुलींना तीन महिन्याकरीता वसतिगृहातून निष्कासित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध योजनांच्या निधी वाटप प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(१८) * ७४१४ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या उपकरातून गरीब मुलींसाठी सायकल वाटप व मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांकरीता ५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून सदर योजनांसाठी सर्व तालुक्यांतून ५,९२८ लाभार्थ्यांनी विविध योजनांसाठी अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अर्जांची अद्याप पडताळणी करुन पात्र लाभार्थ्यांची निवड न केल्यामुळे सदरहू निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेअभावी माहे डिसेंबर, २०२५ अखेरपर्यंत वितरीत करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब मुलींसाठी सायकल वाटप व मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी विविध योजनांकरीता असलेला निधी वाटप न झाल्यामुळे सदरहू लाभार्थी योजनेपासून वंचित राहीले असून सदरहू निधी तात्काळ वितरीत करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात २०% उपकरातून विविध योजनांसाठी रुपये ६ कोटी १२ लक्ष निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत विविध एकूण १७ योजना प्रस्तावित केल्या असून त्यासाठी ५९२८ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त आहेत. सदर योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद ठराव समितीने दिनांक १२/०१/२०२६ रोजी ठराव संमत केले आहेत. या योजनेंतर्गत प्राप्त विविध ५९२८ लाभार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करण्यात आलेली असून लाभार्थी निवड प्रक्रीया राबवून लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) निरंक

-----------------

## पालघर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयाचे व मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१९) * ६८६७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन दहा वर्षे झाली असून सदरहू भाग हा आदिवासी बहुल असल्याने पालघर येथे २०० खाटांच्या जिल्हा शासकीय रुग्णालय इमारतीचे काम सुरु करण्यात आले होते परंतु सद्य:स्थितीत सदरचे काम हे ९५ टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम अपूर्ण आहे तसेच मनोर (जि.पालघर) येथील ट्रामा केअर सेंटरचे काम ही गत १० वर्षांपासून निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याने जिल्ह्यातील ग्रामीण, दुर्गम, आदिवासीबहुल भागातील आदिवासी, गरीब, सामान्य गर्भवती महिलांची उपचाराविना गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयाचे तसेच मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण करून आवश्यक सोयी-सुविधांसह कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, पालघर येथील मुख्य इमारतीचे काम ८४ टक्के पूर्ण झालेले असून त्यासाठी एकूण रुपये १६८.८१ कोटी इतका खर्च झालेला आहे. उर्वरित काम राष्ट्रीय आरोग्य अभियान व पीएम अभियान अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून पूर्ण करण्याचे नियोजन असून त्यासाठी आवश्यक वाढीव निधीचा प्रस्ताव तांत्रिक तपासाधीन आहे.

तसेच सामान्य रुग्णालय व ट्रामा केअर युनिट, मनोर या रुग्णालयाचे बांधकाम ९५ % पूर्ण झालेले असून एकूण रुपये ६६.८० कोटी इतका निधी शासनाने वितरीत केला आहे. रुग्णालयासाठी लागणारी विद्युतीकरणाची कामे स्थापत्य विभागाशी समन्वयाने प्रगतीपथावर असून लिफ्ट मशीन रुमचे तसेच फर्निचरचे काम पूर्ण झाल्यानंतर Electrical Testing, Commissioning and licensing करीता काही कालावधी लागणार आहे. दोन्ही रुग्णालयांच्या कामांसाठी प्राथम्याने निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित असून रुग्णालय रुग्णसेवसाठी पूर्ण क्षमतेने सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे.

सद्य:स्थितीत दोन्ही रुग्णालय इमारतींचे बांधकाम सुरु असले तरी पालघर व मनोर येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित असून या ठिकाणी येणाऱ्या सर्व रुग्णांना आरोग्य सेवा पुरविल्या जात आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांसाठी मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) * ७५०४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामान्य रुग्णालय व अन्य शासकीय रुग्णालयांमध्ये शहरी व ग्रामीण भागातील तसेच इतर राज्यातून येणाऱ्या रुग्णांसाठी आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी शासकीय रुग्णालयात राहण्यास संकुले, स्नानगृहे, सुलभ शौचालये या सारख्या मूलभूत सोयी-सुविधेची पुरेशी व्यवस्था नसल्याने रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शासकीय रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी व त्यांच्या नातेवाईकांसाठी राहण्यास संकुले तसेच स्नानगृहे, सुलभ शौचालये यांची पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) राज्यातील २०० खाटांची १२ रुग्णालये तसेच १०० खाटांच्या ४५ रुग्णालयाच्या ठिकाणी सुलभ शौचालय, स्नानगृह संकुल व राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या दिनांक १४/१०/२०२४ अन्वये धोरणात्मक निर्णय शासनाने घेऊन तसे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील रुग्णालयांतील रिक्त कंत्राटी पदे भरण्याबाबत

**(२१) * ७३३९ श्री.अमित गोरखे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून राज्यात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या व श्रेणीवर्धन केलेल्या आरोग्य संस्थांसाठी नव्याने काल्पनिक कुशल व काल्पनिक अकुशल पदांची निर्मिती करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील एकूण तीन रुग्णालयांचा यामध्ये समावेश असून जिल्हा व स्त्री रुग्णालय, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व धारणी उपजिल्हा रुग्णालयात एकूण १९७ कंत्राटी पदे मंजूर करण्यात आली परंतु चार महिन्यांचा कालावधी होऊनही सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटी मंजूर पदे तसेच कायमस्वरूपी पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशामा-२०२५/प्र.क्र.१३८/रुशआ ई.क्र.१०७४९८० दिनांक ०३/०९/२०२५ अन्वये राज्यात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या व श्रेणीवर्धित झालेल्या आरोग्य संस्थाकरीता बाह्ययंत्रणेमार्फत काल्पनिक कुशल व काल्पनिक अकुशल मनुष्यबळाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदरील प्रशासकीय मान्यतेनुसार आयुक्तालय स्तरावरून दिनांक १९/११/२०२५ रोजी Gem Portal वर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.
(३) सदर कंत्राटी पदे बाह्यस्त्रोताद्वारे व नियमित पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रुग्णालयांमधील रेडिओलॉजी विभागातील चाचण्यांचे दर निश्चित करण्याबाबत

**(२२) * ७३७९ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सचिन अहिर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.पंकज भुजबळ, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अकरा रुग्णालयांमधील क्ष-किरणशास्त्र (रेडिओलॉजी) केंद्राचा आराखडा, वित्तपुरवठा, उभारणी, सुसज्जीकरण, संचालन आणि देखभाल करण्याची जबाबदारी खाजगी संस्थांच्या माध्यमातून करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, मिरज, सांगली, कोल्हापूर, बारामती, पुणे व इतर जिल्ह्यांतील गरीब रुग्णांना विविध आरोग्याच्या चाचण्यांकरीता जादा शुल्क भरावे लागणार असून अन्यत्र आरोग्य चाचण्या करण्यासाठी जादाचा वेळ व पैसे देखील खर्च करावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरीब रुग्णांना आरोग्यासंबंधित चाचण्या करतांना आर्थिक भुर्दंड पडणार नाही यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णांलयामधून सन २०१३ पासून रुग्णांच्या तपासण्या, सेवा व उपचार तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील वैद्यकिय सेवा (राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्क वगळून) निःशुल्क करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रकल्प संचालक, जलजीवन मिशन या पदावरील नियमबाहय प्रतिनियुक्तीबाबत चौकशी करणेबाबत

**(२३)** * **७४८७ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प संचालक, जलजीवन मिशन हे पद महाराष्ट्र विकास सेवेतून प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत स्पष्टपणे नमूद केलेले असतानाही सदर निर्णयाचे उल्लंघन करून व तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांची मान्यता न घेता महसूल विभागाने दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी यांना प्रकल्प संचालक, जलजीवन मिशन या पदावर नियमबाहयपणे प्रतिनियुक्तीने पदस्थापना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, अपर जिल्हाधिकारी यांची झालेली नियमबाहय प्रतिनियुक्ती तात्काळ रद्द करुन प्रतिनियुक्तीबाबत जबाबदार असणारे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) सदर पदासाठी कोणतेही सेवा प्रवेश नियम नाहीत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०९/२०२० अन्वये जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर पदावर प्रतिनियुक्तीकरीता अर्हता देण्यात आलेली आहे. तथापि, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फ़त महसूल विभागास करण्यात आलेल्या शिफारशीनुसार शासन आदेश क्रमांक पदोन्नती २०२२/प्र.क्र.३२/ ई-१, दिनांक ०२/११/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित अपर जिल्हाधिकारी यांची पदस्थापना पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन या पदावर करण्यात आली. सदर प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यापुर्वी महसूल व वन विभागामार्फ़त मा.मुख्यमंत्री महोदयांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत संबंधित अपर जिल्हाधिकारी यांची महसूल व वन विभागाच्या दिनांक २०/१०/२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये पदोन्नती झाली असून सदर पदावरुन त्यांना एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आला आहे. सद्य:स्थितीत सदर पदावर जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दिनांक ३१/१०/२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये महाराष्ट्र विकास सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्री क्षेत्र अवधूत महाराज संस्थान सावंगा (विठोबा) (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील तीर्थक्षेत्राकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४)** * **७३५३ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र अवधूत महाराज संस्थान सावंगा (विठोबा) (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील तीर्थक्षेत्र हे ४५०-५०० वर्षे प्राचीन असून सदर ठिकाणी वर्षाला दोनवेळा मोठ्या प्रमाणात यात्रा भरत असून संस्थानाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा प्राप्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तीर्थक्षेत्राला दरवर्षी लाखोंच्या संख्येने भाविक भेट देत असून हे तीर्थक्षेत्र भाविकांचे श्रध्दास्थान असल्यामुळे सदर संस्थानाच्या विकासाकरीता व भाविकांना सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) श्री क्षेत्र अवधूत महाराज संस्थान सावंगा विठोबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती या तीर्थक्षेत्रास शासन निर्णय दिनांक ०१/११/२०१३ अन्वये "ब" वर्ग दर्जा देण्यात आला आहे. सदर तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या विविध विकास कामांना शासन निर्णय दिनांक २२/०८/२०१४ अन्वये रुपये ०.६५ कोटी व शासन निर्णय दिनांक १३/०३/२०२४ अन्वये रुपये १.३५ कोटी अशी एकूण रुपये २.०० कोटीची प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच संपूर्ण निधी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांना वेळोवेळी वितरीत केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरोग्य सेवा आयुक्तालयातंर्गत कार्यरत गट क व ड संवर्गातील नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करणेबाबत

**(२५) * ६९९२ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागातील गट क व ड संवर्गाकरीता नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला असून सदर निर्णय निर्गमित करण्यापूर्वी आरोग्य सेवा आयुक्तालय अथवा संचालनालय यांचेकडून कोणतेही प्रस्ताव न मागविता परस्पर शासन निर्णय निर्गमित करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णय कर्मचाऱ्यांच्या हिताचा नसल्याने रद्द करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनास पत्राद्वारे केली आहे तसेच कर्मचारी संघटनेने वेळोवेळी निवेदने, निदर्शने करुनही शासनाकडून याबाबत कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याने येथील कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबतचा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९/११/२०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विभाग प्रमुखास प्राप्त अधिकारानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व परिमंडळे) यांना नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबत दिनांक १६/०२/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) प्रश्नाधीन विषयाबाबत मा.लोकप्रतिनिधी यांची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) गट- क व ड संवर्गातील तांत्रिक व अतांत्रिक पदे वेगवेगळया नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालील असल्याने आपत्कालीन / तातडीच्या परिस्थितीत अशी पदे रुग्णसेवेसाठी उपलब्ध करुन देण्यास अडचणी निर्माण होत होत्या. आरोग्यसेवेची व्याप्ती संपूर्ण राज्यभर असल्याने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता भासत असल्याने अशावेळी आरोग्य विषयक विविध कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता एकछत्री नियुक्ती प्राधिकारी असणे गरजेचे होते. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९/११/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विभागाने उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व परिमंडळे) यांना नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याचा निर्णय दिनांक १६/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय उभारण्याबाबत

**(२६) * ७५९८ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यात दिवसाला शेकडो लोक नव्याने वास्तव्यास येत असून नव्याने सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेलची लोकसंख्या ही झपाटयाने वाढत असल्याने येथील वैद्यकीय व्यवस्था सुरळीत व्हावी तसेच पनवेल केंद्रबिंदू असल्याने लगतच्या सर्व जिल्ह्यातील रुग्णांना वेळेत उपचार घेता यावे म्हणून सेंट जॉर्ज हॉस्पिटल व सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या धर्तीवर पनवेल येथे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सुरू करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदरहू मागणीचा गांभीर्याने विचार न करता अलिबाग, जि.रायगड याठिकाणी एक वैद्यकीय महाविद्यालय असल्याने दुसरे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करता येणार नसल्याचे कारण देत पुढे कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल लगत मुंबई-पुणे महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग, अटल सेतू, वसई-विरार- अलिबाग कॉरिडोर हे महत्त्वपूर्ण महामार्ग असल्याने वाढत्या अपघातांचे प्रमाण लक्षात घेता रुग्णांवर वेळेत व योग्य उपचार व्हावेत व भविष्याच्या दृष्टीने केंद्रबिंदू असलेल्या पनवेल येथे अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करणे आवश्यक असल्याने सेंट जॉर्ज हॉस्पिटल व सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या धर्तीवर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय एक विशेष बाब म्हणून उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ५०० रुग्णखाटांचे संलग्न रुग्णालय स्थापन करण्यास शासन निर्णय दिनांक ३१/०१/२०१२ अन्वये मान्यता दिली आहे. सदर महाविद्यालयात सन २०२१-२२ पासून प्रथम वर्षासाठी विद्यार्थी प्रवेशित करण्यात येत असून

महाविद्यालय व रुग्णालयाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने ज्या जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय नव्हते तिथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेस मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगलीसह राज्यातील ग्रामीण व जिल्हा रुग्णालयांचा निधी औषध खरेदीसाठी खर्च करण्याबाबत

**(२७) * ७४५५ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात शासनाकडून ग्रामीण रुग्णालय आणि जिल्हा उप रुग्णालयाच्या माध्यमातून निधीची तरतूद करण्यात येते मात्र सदर निधी खर्च करण्याचा अधिकार जिल्हास्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडे असल्यामुळे सदर निधी सामान्य रुग्णसेवेसाठीच्या औषध खरेदी ऐवजी अन्य साहित्य खरेदीला होत असल्याने रुग्णांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात एकमेव हिमोफिलिया सेंटर कवठे महांकाळ उपजिल्हा रुग्णालयात असताना तिथे "फॅक्टर" इंजेक्शन उपलब्ध नसल्याने बाधित रुग्णाला उपचारासाठी खाजगीत सदर इंजेक्शन खरेदी करावे लागत असल्याने ५० ते ६० हजार रुपये या इंजेक्शनसाठी खर्च करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्हासह राज्यभरातील ग्रामीण आणि जिल्हा रुग्णालयांना देण्यात येणारा निधी औषधासाठी खर्च करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

वार्षिक जिल्हा नियोजनमधील रुग्णालयीन औषधी, साहित्य व सामुग्री याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात प्राथमिकतेने वर्षभरासाठी आवश्यक औषधसाठा घेतला जातो व औषध खरेदीवर आवश्यक खर्च केल्यानंतरच इतर साहित्य व साधनसामुग्री याची खरेदी करण्यात येते. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा शल्यचिकित्सक, सांगली यांच्याकडून रुपये ३.७० कोटी इतक्या रकमेची औषधी खरेदी प्रस्तावित आहे.
(२) हे अंशत: खरे आहें.
हिमोफिलिया फॅक्टरचा पुरवठा हा महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाकडून राज्यभरात करण्यात येतो. हिमोफिलिया सेंटर कवठेमहांकाळ येथे डिसेंबर, २०२५ मध्ये फॅक्टरचा तुटवडा होता.तरी प्राधिकरणाकडून तसेच जिल्हा रुग्णालय, सातारा यांच्याकडून सदरची औषधे (फॅक्टर) उपलब्ध करुन देण्यात आलेली असून सद्य:स्थितीत "फॅक्टर" इंजेक्शनचा साठा उपलब्ध आहे. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून फॅक्टर इंजेक्शन खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) राज्यातील शासकीय रूग्णालयांकरीता स्थानिक स्तरावरील औषधी व साहित्य खरेदीसाठी आयुक्त, आरोग्य सेवा यांना राज्यस्तरीय अनुदानातून निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे राज्यस्तरीय अनुदानातून तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत प्राप्त निधीतून आयुक्त,आरोग्य सेवा यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या मागणीनुसार महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत वेळोवेळी औषध पुरवठा करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील श्रवणदोषग्रस्त लहान बालकांवरील कॉकलीअर इम्प्लांट शस्त्रक्रियेची वयोमर्यादा व निधीमध्ये वाढ करण्याबाबत

**(२८)** * **७२०० श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य योजनांमधून श्रवणदोषग्रस्त लहान बालकांना सर्वसाधारण प्रवाहात आणणाऱ्या कॉकलीअर शस्त्रक्रियेसाठी (श्रवणशक्तीशी संबंधित वैद्यकीय प्रक्रिया) सध्या मिळणारी रुपये २ लाखांची मदत ही अत्यंत कमी असून उपचाराचा वास्तविक खर्च रुपये ६ लाख इतका असल्याचे तसेच सदर विकाराचे निश्चित निदान आणि उपचाराची दिशा ठरवण्यासाठी ३.५ वर्षांचा कालावधी लागत असल्याने सध्याची शस्त्रक्रियेसाठी घातलेली २ वर्षांची वयोमर्यादा वैज्ञानिकदृष्ट्या अपुरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निदान प्रक्रियेस लागणारा वेळ लक्षात घेऊन वयोमर्यादा ३.५ वर्षे वाढविण्याबाबत तसेच अपुऱ्या निधी आणि अल्प वयोमर्यादेमुळे प्रतीक्षेत असलेल्या १२०० बालकांसाठी शासनाने विशेष निधी (Special Provision) उपलब्ध करून देऊन, एका निर्धारित वेळेत त्यांच्या शस्त्रक्रिया पूर्ण करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कॉकलीअर इम्प्लांट शस्त्रक्रियेच्या लाभाच्या बाबतीत इतर राज्यांच्या (उदा. रुपये ६ लाख मदत आणि ३.५ वर्षे वयोमर्यादा) धोरणांचा अभ्यास करून बालकांच्या कल्याणासाठी समान आणि उदार धोरण राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

राज्य शासन व केंद्र शासनाकडून जन्मत:च ऐकू न येणाऱ्या लहान बालकांसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व ADIP या योजनेंतर्गत कॉकलीअर इम्प्लॉन्ट (Cochlear Implant Surgery) सर्जरी केली जाते.

राज्यातील सर्व जिल्ह्यात या कार्यक्रमांतर्गत दोन वर्षापर्यंतच्या बालकांवर दिनांक ०१ एप्रिल, २०१३ पासून सदर सर्जरी केली जाते. सन २०२३-२४ मध्ये १४५ बालकांवर, सन २०२४-२५ मध्ये २०१ बालकांवर आणि सन २०२५ मध्ये माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत ५० बालकांवर Cochlear Implant Surgery करण्यात आलेली आहे. Cochlear Implant Surgery शस्त्रक्रियेचा लाभ जास्तीत जास्त बालकांना व्हावा याउद्देषाने वयोमर्यादा वय वर्षे ५ पर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास दिनांक ३०. ०८. २०२२ व दिनांक २५. ०७. २०२३ अन्वये सादर करण्यात आला आहे.

याशिवाय महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत (MJPJAY) अंतर्गत Cochlear Implant Surgery करीता श्रवणदोष मुक्त बालकांची वयोमर्यादा ५ वर्ष आणि खर्च मर्यादा रुपये ७ लाखापर्यंत करण्याची बाब राज्य शासनाच्या स्वतंत्रपणे विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लासलगाव (जि.नाशिक) शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(२९) * ६६०५ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विंचुर-लासलगाव १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (ता.निफाड, जि.नाशिक) ही लासलगाव आणि विंचूर या प्रमुख ठिकाणांसह एकूण १६ गावांना पाणीपुरवठा करणारी एक महत्त्वाची योजना आहे, परंतु सद्य:स्थितीत सदर योजनेतून अनियमित पाणीपुरवठा होत असल्यामुळे लासलगाव शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना सुरू करण्याची मागणी येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जुलै, २०२५ व दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि नाशिक जिल्हा परिषदेकडे केलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लासलगाव शहराचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी खडकमाळेगाव धरण उध्दव यावरून शहरासाठी जलवाहिनीव्दारे स्वतंत्र पाणीपुरवठा योजना करण्यासाठी ग्रामपंचायत लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) यांनी सुद्धा नाशिक जिल्हा परिषदेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने लासलगाव शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

याबाबतची मागणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नाशिक यांच्याकडे दिनांक ०६/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेली आहे.
(२) नाही.
(३) प्राथमिक स्थळ पाहणी करून अहवाल तयार करण्याची कार्यवाही ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांच्यामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे क्षेत्रमाहुली (ता.जि.सातारा) येथील सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांना त्यांच्या पदावर पुनर्स्थापित करण्याबाबत**

**(३०) * ७७६२ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे क्षेत्रमाहुली (ता.जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच व ३ सदस्य यांना मा.जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या आदेशान्वये जात पडताळणी विहित कालावधीत सादर न केल्यामुळे अपात्र केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यपाल महोदयांनी दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी अध्यादेश काढून ज्या सरपंच व सदस्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत १२ महिने वाढविली आहे त्या सरपंच व सदस्यांना पात्र करण्याचे आदेश दिले असून त्याआधारे मौजे क्षेत्रमाहुली (ता.जि.सातारा) येथील पात्र ठरलेल्या सरपंच व सदस्यांना मा.जिल्हाधिकारी, सातारा यांनी अद्यापही पात्र घोषित केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे क्षेत्रमाहुली (ता.जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच व ३ सदस्यांना पुर्ववत त्याच पदावर पुनर्स्थापित (reinstate) कायद्याने केले असतानाही त्यांना पात्र ठरविण्याच्या प्रक्रियेस विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीअंती उक्त सरपंच व सदस्यांना पात्र करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) होय, खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक ११/०२/२०२५ च्या आदेशाविरुध्द मौजे क्षेत्रमाहुली येथील सरपंच व सदस्य यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक १३/०३/२०२५ रोजी रिट याचिका क्रमांक ५७६५/२०२५ दाखल केली असून सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व तांत्रिक कर्मचारी इ. पदांची कमतरता दूर करण्याबाबत

**(३१) * ७६५६ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये मनुष्यबळाची कमतरता, अपुरी पायाभूत सुविधा तसेच औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याची असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे तेथील रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध होत नाही, तसेच रुग्णांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये मनुष्यबळाची कमतरता दूर करून, पायाभूत सुविधा व औषधे उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) संवर्गातील ४१२ पदे सन २०२५ मध्ये नामनिर्देशनाने भरण्यात आली आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) यांची रिक्त असलेली १४४० पदांची जाहिरात दिनांक ०४/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून पद भरती प्रक्रिया सूरू करण्यात येत आहे. डिसेंबर २०२५ मध्ये १९१ वैद्यकीय अधिकारी यांना गट-ब संवर्गातून गट-अ संवर्गामध्ये पदस्थापना देण्यात आली आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ज्ञ संवर्गातील ३२० पदांच्या जाहिराती महाराष्ट्र लोक सेवा आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील २३ उमेदवारांच्या नावाची शिफारस महाराष्ट्र लोक सेवा आयोगाकडून करण्यात आली असून सदर उमेदवारांना पदस्थापना देण्याची कार्यवाही चालू आहे. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ज्ञ संवर्गातील एकूण पदोन्नती साठी पात्र १३६ अधिकाऱ्यांपैकी ६५ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश निर्गमित केले असून उर्वरीत अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने पदस्थापनेची कार्यवाही चालू आहे.

दंतशल्यचिकित्सक २८९ पदे, वैद्यकीय अधिकारी गट-ब ५५४ पदे, प्रशासकीय अधिकारी ७३ पदे, जिल्हा हिवताप अधिकारी २४ पदे, नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच प्रशाकीय अधिकारी ३३ पदे, सांखिकी अधिकारी १० पदे व गट-ब मधील संवर्गातील अन्य पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही चालू आहे.

गट-क व ड संवर्गातील एकूण १०,९०५ पदांची जाहिरात सन २०२३ मध्ये प्रसिध्द करण्यात आली असून ९,२०६ पदे भरण्यात आली आहेत. सदर जाहीरातीतील निवडसुचिस दिनांक १६/०२/२०२६ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून सदर निवडसूचितील रिक्त झालेल्या ४९४ पदांची भरती प्रक्रीया सूरू ¬आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कंत्राटी पध्दतीने ३,६३३ वैद्यकीय अधिकारी, ६१ तज्ञ डॉक्टरांची व ११४७८ परिचर्या यांच्या नियुक्त्या तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर गठीत केलेल्या समिती मार्फत ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे रुग्णसेववर कोणताही प्रतिकूल परिणाम झाला असल्याचे दिसून येत नाही.

रुग्णसेवेसाठी आवश्यक असलेली औषधे/उपकरणे यांची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरणाकडून करण्यात येऊन संबधीत संस्थांना मागणी नुसार पुरवठा करण्यात येतो. तसेच जिल्हा स्तरावरील जिल्हा वार्षीक योजना, जिल्हा परिषदेकडील सेस फंड, राष्ट्रीय आरोग्य अभियान व इतर योजनांद्वारे उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून स्थानिक पातळीवर अत्यावशक औषधे व उपकरणे खरेदी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विडी उद्योगातील कंपन्यांकडून कामगारांना किमान वेतन व मूलभूत सुविधा देण्याबाबत

**(३२)** * **७५८१ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विडी उद्योगात सुमारे २ लाख ५६ हजार कामगार कार्यरत असून त्यापैकी सोलापूर जिल्ह्यात सुमारे ७० हजारांहून अधिक विडी कामगार आहेत तसेच त्यामध्ये सुमारे ९८ टक्के महिला कामगार असून त्यांना किमान वेतन अधिनियम तसेच अन्य कामगार कायद्यानुसार वेतन व मूलभूत सुविधा देण्यात येत नसल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विडी उद्योगातील कंपन्यांमध्ये कार्यरत महिला व इतर कामगारांना नोंदणीकृत कामगारांचा दर्जा देऊन त्यांना भविष्य निर्वाह निधी (PF), ग्रॅच्युईटी तसेच किमान वेतन कायद्यानुसार वेतनाचा लाभ मिळावा यासाठी समर्थन संस्थेमार्फत मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (उद्योग), मा.मंत्री (कामगार) तसेच संबंधित सचिव यांच्याकडे दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी त्यासुमारास निवेदन सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने विडी उद्योगातील कंपन्यांकडून कामगार कायद्यांचे उल्लंघन होत असून याबाबत चौकशी करून दोषी कंपन्यांविरुध्द कारवाई करून संबंधित कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी व इतर लाभ मिळावेत यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१), (२) व (३) राज्यात विडी उद्योगात सुमारे ५३,१५५ कामगार कार्यरत असून त्यापैकी ४९,०७९ महिला व ४,०७६ एवढे पुरुष आहेत. सोलापूर जिल्ह्यात सुमारे ३३,५०० विडी कामगार असून त्यापैकी ३२,००० महिला व १५०० पुरुष आहेत.

समर्थन संस्थेने दिनांक २९/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये विडी उद्योगातील कंपन्यांमधील कार्यरत कामगारांना भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी तसेच किमान वेतन व इतर समस्यांच्या अनुषंगाने संबंधित कामगार कायद्यानुसार लाभ मिळण्याबाबत निवेदन शासनास सादर केले आहे.

तसेच, यापूर्वीही विविध कामगार संघटनांमार्फत विडी कामगारांनी केलेल्या विविध मागण्यांबाबत मा.मंत्री (कामगार) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६/०९/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विडी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधी यांचेसमवेत संयुक्त बैठक घेऊन सदर मागण्यांच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत कामगार आयुक्त यांना निदेश देण्यात आले होते.

दरम्यान केंद्र शासनामार्फत दिनांक २१/११/२०२५ रोजी संपूर्ण देशात एकूण २९ कामगार कायदे रद्द करुन, नवीन चार कामगार संहिता लागू केल्या आहेत. त्यामध्ये किमान वेतन अधिनियम, १९४८ रद्द करुन वेतन संहिता, २०१९ लागू केली आहे. सदर वेतन संहितेनुसार अतिकुशल, कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगार असे कामगारांच्या कार्यक्षमतेनुसार ४ संवर्गात वर्गीकरण केले आहे. सदर वेतन संहितेमध्ये मूळ वेतन, महागाई भत्ता व राखीव भत्त्याचा समावेश असून लोकसंख्येच्या आधारावर क्षेत्र निश्चित करुन केंद्र शासनामार्फत वेतननिश्चिती करण्यात येणार आहे. दरम्यान केंद्र शासनामार्फत सदर वेतन संहितेनुसार दिनांक ३०/१२/२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये वेतन संहिता मसूदा नियम, २०२५ प्रसिध्द केले असून, त्यानुसार राज्य शासनामार्फत महाराष्ट्र वेतन संहिता मसूदा नियम, २०२६ प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(३३) * ७७२६ श्री.संजय खोडके, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, ॲड.अनिल परब, श्री.इद्रिस नायकवडी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सचिन अहिर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजना, पोषण आहार योजना व आरोग्य तपासणी कार्यक्रम राबविले जात असताना सुद्धा योजनांमधील त्रुटीमुळे व कुपोषणावर प्रभावी नियंत्रण नसल्याने १ लाख ३७ हजार ४०७ बालके कुपोषित असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२६ समर्थन संस्थेने मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना निवेदनाद्वारे कळविले असून मागील अडीच वर्षांत पाच वर्षांखालील ३२ हजार २२६ मुलांचा आणि २ हजार ८६१ मातांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांतही (जि.अमरावती) दरवर्षी कोट्यवधी रुपयांची योजना राबवून व ११ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ उपजिल्हा रुग्णालय, २ ग्रामीण रुग्णालये तसेच अनेक ठिकाणी उपकेंद्रे असूनही माहे एप्रिल ते नोव्हेंबर, २०२५ या आठ महिन्यांमध्ये जवळपास १०७ बालमृत्यू व ४ मातामृत्यू झाल्याची मुंबई उपनगर जिल्ह्यात १६ हजार ३४४ बालके, गोंदिया जिल्ह्यामध्ये १५१५ बालके, पिंपरी चिंचवड शहरातील ३६१ अंगणवाड्यामध्ये १२६१ बालके कुपोषित असल्याचे तसेच पालघर जिल्ह्यासह मुंबई शहर व ठाणे जिल्ह्यातही व शहरी भागातील झोपडपट्ट्या, स्थलांतरित मजूर वस्त्या व दुर्गम परिसरातील मध्यम व तीव्र कुपोषित बालकांची संख्या वाढत असून एकटया पालघर जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या सन २०१३ मध्ये ६२९३ तसेच सन २०२३ मध्ये ३३९९१ एवढी असून जळगाव जिल्ह्यात माहे ऑक्टोबर मध्ये सर्वेक्षणात ६७२ बालके तीव्र कुपोषित श्रेणीमध्ये आढळली असून मध्यम कुपोषित बालकांची संख्या सुमारे ५ हजारांच्या घरात असून जिल्ह्यातील यावल, रावेर, पाचोरा आणि चाळीसगाव यांसारख्या तालुक्यांमध्ये कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यात २० हजार ४१४ पदे रिक्त असून बालविकास अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचीही भरती प्रलंबित असल्याने परिणामी ग्रामीण भागातील लहान मुलांचे आरोग्य, पोषण आणि विकास यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कुपोषित मुलांपैकी तीव्र व मध्यम कुपोषणग्रस्त मुलांची जिल्हानिहाय व तालुकानिहाय संख्या किती आहे तसेच नवजात बालमृत्यू मागे कुपोषण आणि मातामधील संसर्गजन्य आजार ही प्रमुख कारणे असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मेळघाटातील बाल व मातांचे मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी व आरोग्याच्या आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध करुन येथील ४० गावांमध्ये शुध्द पाणी, दळणवळणाच्या सुविधा, वीज, रस्ते व रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच राज्यातील मुलांमधील कुपोषण वाढीचे निरीक्षण आणि पूरक पोषण आहार वितरणामध्ये सुधारणा करून गरोदर महिलांना योग्य आरोग्य उपचार व आहार देण्याच्या दृष्टीने व महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य तसेच इतर संबंधित विभागांमध्ये समन्वयाने योजनांमधील त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने तसेच शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांचे सामाजिक लेखा परीक्षण करण्यासाठी आणि एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत बालविकास अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्यासह २० हजार ४१४ रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२), (३) व (४) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत, अंगणवाडी सेविकेमार्फत दरमहा बालकांची वजन व उंची मोजली जाते. या माहितीची नोंद नियमितपणे ‘पोषण ट्रॅकर’ (Poshan Tracker) या संगणकीय प्रणालीमध्ये करण्यात येते. त्याआधारे सदर प्रणालीद्वारे बालकांची सामान्य, मध्यम कुपोषित किंवा तीव्र कुपोषित अशी श्रेणी निश्चित केली जाते. पोषण ट्रॅकरवरील आकडेवारीनुसार, गेल्या तीन वर्षांतील राज्याची कुपोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | वजन व उंची घेतलेल्या बालकांची संख्या | एकूण तीव्र कुपोषित बालके | (%) | एकूण मध्यम कुपोषित बालके | (%) |
|---|---|---|---|---|---|
| मार्च २०२३ | ४१६७१८० | ८०२४८ | १.९३ | २१२२०३ | ५.०९ |
| मार्च २०२४ | ४२६२६५२ | ५१४७५ | १.२१ | १६६९९८ | ३.९२ |
| मार्च २०२५ | ४८१०३०२ | २९१०७ | ०.६१ | १४९६१७ | ३.११ |
| डिसेंबर २०२५ | ४४७६०२८ | १६१०२ | ०.३६ | १०७४८९ | २.४० |
| जानेवारी २०२६ | ४४३५४०४ | १४६६० | ०.३३ | ९९२७५ | २.२४ |

मागील तीन वर्षातील आकडेवारीवरून राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते. तसेच माहे जानेवारी, २०२६ मधील जिल्हानिहाय कुपोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| जिल्हा | वजन व उंची घेतलेल्या बालकांची संख्या | तीव्र कुपोषित बालके | (%) | मध्यम कुपोषित बालके | (%) |
|---|---|---|---|---|---|
| अहिल्यानगर | २१९१६८ | ५१२ | ०.२३ | ३६८२ | १.६८ |
| अकोला | ६७३६० | ३९७ | ०.५९ | २२९३ | ३.४० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अमरावती | १३१४९८ | ३३४ | ०.२५ | ३०८६ | २.३५ |
| बीड | १३१६६६ | ५८० | ०.४४ | ३६२९ | २.७६ |
| भंडारा | ५४५७७ | ८९ | ०.१६ | ७४९ | १.३७ |
| बुलढाणा | १३१८३९ | २६६ | ०.२० | १६६५ | १.२६ |
| चंद्रपुर | ८६०९४ | २८४ | ०.३३ | २१२८ | २.४७ |
| छत्रपती संभाजीनगर | १७७९२५ | ७५१ | ०.४२ | ५१०९ | २.८७ |
| धाराशिव | ८०६०५ | १८४ | ०.२३ | १४६३ | १.८२ |
| धुळे | १२७४१७ | ९१२ | ०.७२ | ४३३९ | ३.४१ |
| गडचिरोली | ६६६२४ | ३११ | ०.४७ | २७२२ | ४.०९ |
| गोंदिया | ७२४१९ | १३८ | ०.१९ | ११३१ | १.५६ |
| हिंगोली | ६७१८२ | २०१ | ०.३० | १६७२ | २.४९ |
| जळगाव | २०६९२६ | ६०६ | ०.२९ | ४६९३ | २.२७ |
| जालना | १०४७८५ | १९० | ०.१८ | १४६९ | १.४० |
| कोल्हापूर | १४६९२९ | २५३ | ०.१७ | १५१४ | १.०३ |
| लातूर | १०९९९७ | २०५ | ०.१९ | १९१५ | १.७४ |
| मुंबई शहर | ४४२१८ | २७४ | ०.६२ | १३७४ | ३.११ |
| मुंबई उपनगर | २१२०९८ | ६८२ | ०.३२ | ५६६६ | २.६७ |
| नागपूर | १५९३१९ | ४३३ | ०.२७ | ३५३३ | २.२२ |
| नांदेड | १७५५२७ | ९७९ | ०.५६ | ४०९५ | २.३३ |
| नंदुरबार | ११२६०९ | ९५२ | ०.८५ | ७४५४ | ६.६२ |
| नाशिक | २८९४२० | ७३६ | ०.२५ | ५३६६ | १.८५ |
| पालघर | १२६२७२ | ३०५ | ०.२४ | २३५२ | १.८६ |
| परभणी | ८१०५७ | ५२१ | ०.६४ | २५२१ | ३.११ |
| पुणे | २५७६२४ | ८३७ | ०.३२ | ४४२३ | १.७२ |
| रायगड | ९१७०६ | १७१ | ०.१९ | ९९३ | १.०८ |
| रत्नागिरी | ३९९९८ | ४१ | ०.१० | ७९० | १.९८ |
| सांगली | ११६४९५ | २६० | ०.२२ | १९४० | १.६७ |
| सातारा | १०६४९६ | २३८ | ०.२२ | १६१५ | १.५२ |
| सिंधुदुर्ग | १८१२८ | ३२ | ०.१८ | ३७९ | २.०९ |
| सोलापूर | २०८५४४ | ५१६ | ०.२५ | ३३४४ | १.६० |
| ठाणे | १६११३७ | ४०२ | ०.२५ | ४२२२ | २.६१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्धा | ५१२५२ | ६१ | ०.१२ | ६९१ | १.३५ |
| वाशिम | ६९९८३ | १५४ | ०.२२ | ९७३ | १.३९ |
| यवतमाळ | १२९७१० | ८५३ | ०.६६ | ४२८५ | ३.३० |

मागील ३ वर्षामध्ये राज्यातील कुपोषणाचे प्रमाणे कमी झालेले आहे.

तसेच, आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या महितीनुसार मागील अडीच वर्षात (सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६-सप्टेंबर अखेर पाच वर्षाखालील एकूण ३४३२५ इतके बाल मृत्यू झालेले आहेत. तसेच धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यात माहे एप्रिल ते नोव्हेंबर, २०२५ या आठ महिन्यांमध्ये १०७ बालमृत्यू झालेले आहेत. या मृत्युंची प्रमुख कारणे मुदतपूर्व जन्म/कमी वजनाची बालके (Prematurity/Low Birth Weight), जंतुसंसर्ग (Sepsis), न्युमोनिया, जन्मत: श्वासावरोध (Birth Asphyxia) इत्यादी आहेत

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत मंजूर तसेच भरलेल्या पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| बालविकास प्रकल्प अधिकारी | ५५३ | २१८ | ३३५ |
| मुख्यसेविका/पर्यवेक्षिका | ३८९९ | २५३५ | १३६४ |
| अंगणवाडी सेविका | ११०६६४ | १०९५८१ | १०८३ |
| अंगणवाडी मदतनीस | ११०६६४ | १०६६०५ | ४०५९ |

वरीलप्रमाणे रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कुपोषण कमी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात:- १) पूरक पोषण आहार:- ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, तसेच गरोदर महिला आणि स्तनदा मातांना ‘टेक होम रेशन’ (THR) दिले जाते. ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाडी केंद्रांवर गरम ताजा आहार पुरवला जातो.

२) नियमित आरोग्य तपासणी:- अंगणवाडी सेविकांमार्फत बालकांची उंची व वजन, तसेच गरोदर मातांचे वजन नियमितपणे घेतले जाते. या नोंदीमुळे त्यांच्या पोषण स्थितीवर लक्ष ठेवणे शक्य होते.

३) भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतंर्गत आदिवासी क्षेत्रातील गरोदर महिला आणि स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार दिला जातो. तसेच, ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार दिवस अंडी/केळी देण्यात येतात. त्यामध्ये शाकाहारी बालकांना दररोज २ केळी आणि मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

४) सॅम (SAM) बालकांसाठी विशेष उपक्रम:- राज्यातील अति तीव्र कुपोषित (SAM) बालकांसाठी ग्राम/नागरी बालविकास केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांमध्ये सॅम बालकांना दिवसातून तीन वेळा ‘एनर्जी डेन्स न्यूट्रिशिअस फूड’ पुरवले जाते. आवश्यकतेनुसार, आरोग्य विभागामार्फत त्यांना औषधोपचारही दिले जातात. तसेच, दुर्धर आजारांनी ग्रस्त असलेल्या सॅम बालकांना आरोग्य विभागाच्या पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये (NRC) दाखल केले जाते, जिथे त्यांना औषधोपचारासोबत विशेष पोषण आहारही दिला जातो.

५) पोषण अभियान आणि जनजागृती:पोषण अभियानअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालके, किशोरवयीन मुली आणि महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरांवर निरंतर शिक्षण वृद्धी दृष्टिकोन (ILA), समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाइम मॉनिटरिंग (ICT-RTM) आणि जनआंदोलन असे उपक्रम राबवले जात आहेत.

६) 'बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस' अभियान:राज्यातील नागरी व ग्रामीण भागातील कुपोषण कमी करण्यासाठी, बाळाच्या आयुष्यातील "पहिले सुवर्णमयी १००० दिवस" या महत्त्वाच्या टप्प्याविषयी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील जलजीवन मिशन योजनेतंर्गतची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत

**(३४)** * **६७५९ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात जलजीवन मिशन योजनेतंर्गतची अनेक कामे अपूर्णावस्थेत असून नागरिकांना पिण्याचे शुध्द पाणी मिळावे याकरीता सदरची योजना आहे तथापि, सदर योजनेची कामे अपूर्णावस्थेत असल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या नळपाणी योजनेपासून वंचित रहावे लागत असून अद्यापही नळजोडणी मिळाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील अपूर्णावस्थेतील जलजीवन मिशन योजनेतंर्गतची कामे पूर्ण करुन नागरिकांना नळाव्दारे शुध्द पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत मराठवाडा विभागात एकूण ८४७८ ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची कामे घेण्यात आली असून अद्यापपर्यंत त्यापैकी ४०४४ योजनांची कामे पूर्ण झाली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावर असणाऱ्या कामांपैकी १५३५ इतक्या योजनांची कामे ही भौतिक प्रगतीच्या ७६ ते ९९ टक्के मध्ये आहेत. मराठवाडा विभागातील ग्रामीण भागात एकूण २९,७५,४६७ इतकी घरे असून जल जीवन मिशन अंतर्गत त्यापैकी २६,६८,११० घरांना नळ जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत नळ जोडण्या माहे डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

माहे ऑक्टोबर, २०२४ पासून जल जीवन मिशन योजनेचा केंद्र शासनाचा हिस्सा प्राप्त झालेला नाही. तसेच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील योजनांसाठी आवश्यक परवानग्या विलंबाने मिळाल्यामुळे कामांच्या प्रगतीवर परिणाम झालेला आहे. तथापि, पाणीपुरवठा योजनांच्या कामांची प्रगती चालु रहावी, याकरीता राज्य शासनाने विशेष बाब म्हणून सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण रुपये ४८३१.८७ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणांना उपलब्ध करुन दिला आहे. तसेच केंद्र शासनाचा निधी प्राप्त करुन घेण्याच्या अनुषंगाने विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ईश्वरपूर (ता.वाळवा, जि.सांगली) येथील ट्रामा केअर सेंटर व वाटुळ (ता.राजापूर) येथे सुपर मल्टी स्पेशालिटी रुग्णालय यांना प्रशासकीय मान्यता देऊन कार्यान्वित करण्याबाबत

**(३५) * ७६७६ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईश्वरपूर (ता.वाळवा, जि.सांगली) हे शहर वेगाने विस्तारत असून दळणवळणाच्या वाढत्या प्रमाणामुळे आणि पुणे-बेंगळरू राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या अपघातांमुळे या भागात ट्रामा केअर सेंटरची आवश्यकता असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रामा केअर सेंटरअभावी व विद्यमान सुविधांच्या मर्यादेमुळे रस्ते अपघातग्रस्तांना जिल्हा रुग्णालय अथवा अन्य दूरवरच्या मोठ्या रुग्णालयात न्यावे लागत असल्यामुळे उपचारात विलंब होतो व गंभीर जखमी झालेल्या रुग्णाचा तात्काळ वैद्यकीय सेवा न मिळाल्यामुळे अनेकदा मृत्यू होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ईश्वरपूर येथे ट्रामा केअर सेंटर आणि १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत शासनाकडून मंजुरी मिळालेली असून प्रशासकीय मान्यता प्रलंबित आहे तसेच कोकणातील मुंबई- गोवा महामार्गावरील वाटुळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल हे देखील मंजूर झाले असून त्यासही प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दोन्ही ईश्वरपूर येथे ट्रामा केअर सेंटर व राजापूर तालुक्यातील वाटुळ येथे सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल यांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) खरे नाही.

ईश्वरपूर येथे ५० खाटांचे रुग्णालय कार्यरत असून त्याव्दारे अपघातग्रस्त रुग्णांना सेवा देण्यात येतात.

(३) खरे आहे.

(४) सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक २९/०५/२०२५ अन्वये शासनाने असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, नव्याने रुग्णालय संस्थांच्या बांधकामास मान्यता न देता आधीच हाती घेण्यात आलेली रुग्णसंस्थेची बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य रुग्णसेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यकतेनुसार नवीन ठिकाणी बांधकामांना मान्यता देण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मिशन शक्ती योजनेंतर्गतच्या "वन स्टॉप सेंटर" च्या माध्यमातून जनजागृती करण्याबाबत

**(३६) * ६७२४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अत्याचार पिडित महिलांना तात्काळ वैद्यकीय तसेच कायदे विषयक मदत मिळावी यासाठी शासनाने मिशन शक्ती योजनेंतर्गत मदत केंद्रासह समुपदेशनाच्या सुविधा सुरु केल्या असून "वन स्टॉप सेंटर" च्या माध्यमातून एकाच ठिकाणी मदत, तात्पुरता निवाऱ्याचीही व्यवस्था केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना चांगल्या नसून त्याबाबत जनजागृती झाली नसल्याने अत्याचार झालेल्या मुली व महिलांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुली व महिलांच्या हिंसा व लैंगिक अत्याचाराची प्रकरणे पोलीस व आरोग्य यंत्रणेस यशस्वीपणे हाताळण्यात अपयश येत असून सदर प्रकरणाची संवेदनशीलपणे नोंद घेऊन हाताळली जावीत यासाठी उपरोक्त योजनांबाबत व्यापक स्तरावर जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) केंद्र पुरस्कृत "मिशन शक्ती" अंतर्गत राज्यात कार्यान्वित असलेल्या सर्व वन स्टॉप सेंटरमार्फत योजनेबाबतचे जाणीवजागृती व प्रचार प्रसिध्दीचे कार्यक्रम नियमितपणे घेण्यात येत असल्यामुळे गरजु व संकटग्रस्त महिला पुढे येऊन घटनांच्या नोंदी करीत असल्याने प्रकरणांच्या नोंदींमध्ये वाढ दिसुन येत आहे.

केंद्र पुरस्कृत वन स्टॉप सेंटर या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्तांचे प्रतिनिधी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यासह व इतर सदस्य असलेली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीमार्फत या योजनेचा नियमित आढावा घेण्यात येतो. जिल्हास्तरावर असलेल्या पोलीस, आरोग्य, शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण इ. यंत्रणेच्या समन्वयाने पिडीत महिलांना आवश्यक ते सहकार्य केले जाते.

त्याचप्रमाणे केंद्र पुरस्कृत महिला सक्षमीकरण केंद्रांमार्फत देखील आवश्यक ते जनजागृती कार्यक्रम घेण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सडक अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३७) * ६६९८ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील वडेगाव, केसरवाडा, शेंडा, डब्बा, सौंदड, कनेरी, मनेरी, गिरोला, कोसमतोंडी, राका, सौंदड, सिंधीपार, बामणी, खडकी, मोगरा, देवपायली, कोहमारा, जांभडी, बिंद्राबन, खजरी, सालेधारणे, पांढरी, डव्वा, सीतेपार, गोंगले, मालीजुंगा, सडक अर्जुनी या गावांमध्ये उभारलेले कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे नादुरुस्त झाल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय झाला असून शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सडक अर्जुनी तालुक्यातील वडेगाव व केसरवाडा गावानजीक असलेले 'काळागोटा एक' व 'काळागोटा दोन' हे बंधारे फुटल्याने येथील पाणी वाया जात असल्याने हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येत नसल्याने शेतकऱ्यांना कोरडवाहू शेतीवर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे जुन्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करून केवळ नवीन बंधाऱ्यांच्या कामावर भर दिला जात असल्याने परिसरातील शेती सिंचनाच्या कामांमध्ये नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यांची निकृष्ट दर्जाची कामे व शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या अधिकारी/ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच सडक अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे योग्य पध्दतीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

गोंदिया जिल्ह्यातील राका सौंदड, घोगरा घाट,मौजा शेंडा, मौजा कोसमतोंडी, मौजा खजरी व मौजा काळागोटा-२ असे एकूण ०६ कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे नादुरुस्त स्थितीत आहेत. उर्वरित बंधारे सुस्थितीत आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सडक अर्जुनी तालुक्यातील काळागोटा-१ हा को.प.बंधारा सुस्थितीत असून तेथील शेतकरी सिंचनाचा लाभ घेत आहेत.

काळागोटा-२ हा को.प.बंधारा फुटल्याने मागील काही वर्षापासून ना-दुरुस्त स्थितीत होता.सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी लागणारा खर्च शासनाच्या मापदंडात बसत नसल्यामुळे सदर बंधाऱ्याच्या वरच्या बाजूस १०० ते १५० मीटर अंतरावर नवीन बंधारा बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

सडक अर्जुनी तालुक्यातील उर्वरित ०५ बंधाऱ्यांपैकी ०२ बंधाऱ्याचे दुरुस्तीची कामे जिल्हा नियोजन समितीचा प्रारुप आराखडा २०२६-२७ मध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत. उर्वरित ०३ बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे जिल्हा नियोजन समितीकडील निधीतून करण्याचे प्रस्तावित आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ मध्ये रुपये १४५ लक्ष किंमतीचे १० व सन २०२५-२६ मध्ये रुपये १६० लक्ष किंमतीचे १२ को.प.बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिकलठाणा (ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील कामगार राज्य विमा रुग्णालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) * ६७४३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाणा (ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्य सेवा देण्यासाठी राज्य कामगार विमा महामंडळाच्या (ई.एस.आय.सी.) रुग्णालयाची स्थापना करण्यात आली असून, सदर रुग्णालय इमारतीचे सन १९९६ मध्ये बांधकाम करण्यात आले असून या रुग्णालयात कामगारांना ओटी, ओपीडी, आय.सी.यु. शस्त्रक्रिया इत्यादी सुविधा पुरवल्या जात आहेत परंतु या रुग्णालयाची इमारत पूर्णत: मोडकळीस आल्याने दैनंदिन कामकाजात अडचणी येत असून सदरहू इमारत जीर्ण अवस्थेत असल्याने येथे पावसाळयात सर्व विभागात पाणी साचत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची दुरवस्था झाल्याने याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करुन सुध्दा इमारत दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यास आला नाही तसेच सदर इमारतीचे अद्याप स्ट्रक्चरल ऑडीट झालेले नसून याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे तात्काळ स्ट्रक्चरल ऑडीट करुन देखभाल दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

चिकलठाणा, ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर येथील राज्य कामगार विमा रुग्णालयाची इमारत सन १९९६ मध्ये बांधण्यात आली असून ती केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अधिपत्याखाली राज्य कामगार विमा महामंडळाच्या मालकीची आहे. सदर रुग्णालयाची इमारत मोडकळीस आलेली नाही. तथापि, सदर रुग्णालयाच्या स्त्री कक्ष विभागात सन २०२५ च्या पावसाळयामध्ये पावसाचे पाणी साचल्याची बाब निदर्शनास आली होती.

(२) व (३) सदर रुग्णालयाच्या इमारत बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरीता महा-राकावि सोसायटी मार्फत राज्य कामगार विमा महामंडळाकडे पाठपुरावा सुरु आहे. तसेच, सदर रुग्णालयाच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीअंतर्गत रूग्णालयातील पाणी गळती प्रतिबंधात्मक कामे व इतर आवश्यक स्थापत्य कामे आगामी पावसाळ्यापुर्वी पूर्ण करण्याची हमी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य कामगार विमा सोसायटी यांना दिली आहे.

(४) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांगणी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णांना बुरशीजन्य औषधे देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेबाबत

**(३९) * ६६३७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगणी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये एक गर्भवती महिला तपासणीसाठी गेली असता तिला दिलेल्या औषधांवर बुरशी लागलेली असल्याचा प्रकार दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गर्भवती महिलेने वैद्यकीय अधिकारी, परिचारिका तसेच औषध निर्माण अधिकाऱ्याकडे याबाबत तक्रार केली असता त्यांनी सदर घटनेची दखल घेतली गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्य अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी डॉक्टर आणि अन्य कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबतचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, अंबरनाथ यांच्यामार्फत करण्यात आलेल्या चौकशीनुसार मौजे वांगणी, ता.अंबरनाथ जि.ठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये Tab Paracetamol या औषधाचे वितरण NABL मान्यताप्राप्त संस्थेमार्फत करण्यात आलेल्या गुणवत्ता तपासणीनुसार करण्यात येत होते. वितरणादरम्यान संबंधित तक्रारदार महिलेने सदर गोळ्यांच्या पाकिटावर डाग असल्याचे आढळून आले असल्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने गोळयांचे वितरण बंद करण्यात येऊन गोळया तपासणीकरीता अन्न व औषध प्रशासन विभाग, ठाणे व NABL मान्यताप्राप्त अन्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आला आहे. सदर अहवाल अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील जलजीवन मिशन योजनेतंर्गतची कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४०) * ७२१९ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र आणि राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात राबविल्या जाणाऱ्या जलजीवन मिशन योजनेतंर्गत एकूण ५१ हजार ५६० पाणीपुरवठा योजना असून त्यापैकी २६ हजार १३१ योजना पूर्ण झाल्या असून २५ हजार ४२९ योजनांना अद्यापही माहे ऑक्टोबर, २०२४ पर्यंत केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्यामुळे सदर योजना अपूर्ण असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यासाठी सुमारे २ हजार २२६ कोटी रुपयांची लोकवर्गणी अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र २२.०९ कोटी रुपये म्हणजेच एक टक्क्याहूनही कमी लोकवर्गणी जमा झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने सुमारे १८००० योजनांना काही बदलासह सुधारित मंजुरी दिली असून त्या योजनांचा आर्थिक भार ही राज्य शासनाला सोसावा लागणार असल्याचे तसेच राज्यातील कंत्राटदारांची ३४ हजार कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्याने या कंत्राटदारांच्या मागण्यांची पूर्तता न केल्यास महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठादार कंत्राटदार संघटनेने कामबंद करण्याचा इशारा दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नळपाणीपुरवठा योजनांच्या ७३ कामांमध्ये अनियमितता आढळून आली असून नाशिक जिल्ह्यातील ११ पाणीपुरवठा योजनांची थकबाकी न भरल्यामुळे व वीज जोडणीस विलंब झाल्यामुळे उक्त योजना कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू योजना तात्काळ पूर्ण करुन प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तसेच केंद्र शासन पुरस्कृत जलजीवन मिशन योजनेच्या कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची थकीत देयके तातडीने अदा करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामामध्ये अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत राज्य शासनाने ७,६९६ प्रस्तावांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या योजनांचा वाढीव आर्थिक भार राज्यशासनाला सोसावा लागणार आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत दिनांक १७/१०/२०२५ अखेर रुपये ७३६३.९१ कोटीची देयके जिल्हास्तरावर अदागीसाठी प्राप्त होती.

राज्यातील जल जीवन मिशनचे काम केलेले कंत्राटदार यांचे मागण्यांसंदर्भात महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांनी दिनांक ६/१२/२०२५ रोजीच्या निवेदनाव्दारे मागण्या पूर्ण न झाल्यास काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता.

(४) होय, हे खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनेंतर्गत ७३ कामांमध्ये अनियमितता आढळून आली असून रुपये ८९,४२,४१८ इतक्या रकमेची अनियमीतता आढळून आली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ नाशिक अंतर्गत ३८ पैकी १८ योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. योजनांच्या प्रगतीनुसार उर्वरित २० नवीन योजनाकरीता वीज जोडणी प्राप्त करून घेणेची कार्यवाही सुरू आहे.

तसेच नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील ११ ग्रामपंचायतीकडे विद्युत देयकाची थकबाकी असल्याने सदर ग्रामपंचायतीस थकबाकी भरणेकामी नाशिक जिल्हा परिषद मार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) जल जीवन मिशन योजनेंतर्गत माहे सप्टेंबर २०२४ नंतर केंद्र हिस्सा अप्राप्त असताना राज्य शासनाने सन २०२४-२५ व सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षांमध्ये विशेष बाब म्हणून अनुक्रमे रुपये २४८३.५८२५ कोटी व रुपये २३४८.२९ कोटी असा एकूण रुपये ४८३१.८७२५ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणेला उपलब्ध करुन दिला आहे.त्यामुळे पाणीपुरवठा योजनांच्या कामांची प्रगती चालु ठेवण्यास मदत होत आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनेंतर्गत आढळून आलेल्या अनियमिततेस जबाबदार असलेल्या तत्कालीन कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांच्या विरूध्द विभागीय चौकशी करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर यांचेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला असून त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांचेकडून कंत्राटदार, सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्यावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रोहा (जि.रायगड) येथील २६ गावांकरिताची पाणी पुरवठा योजना अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(४१) * ८०२३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील पश्चिम खोऱ्यातील २६ गावांची नवीन नळपाणीपुरवठा योजना अपूर्ण आणि अनेक ठिकाणी बंद असल्याने येथील ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, अपूर्णवास्थेतील योजनेच्या कंत्राटदराला देयके अदा करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची कामे अपूर्ण असतानाही योजना ग्रामपंचायतीने ताब्यात घ्यावी याकरीता या परिसरामधील गावातील सरपंचांवर अधिकारी दबाव टाकत असून अपूर्ण काम स्वीकारल्यास ग्रामपंचायतीवर देखभालीचा आर्थिक भार पडणार असल्याने येथील सरपंच हस्तांतरणास विरोध करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना तातडीने पूर्ण करून या गावातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत तसेच योजनेचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या ठेकेदारांवर व उक्त अपूर्णावस्थेतील योजना ग्रामपंचायतीने ताब्यात घेण्यासाठी सरपंचावर दबाव टाकणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत पश्चिम खोऱ्यातील २६ गावांकरीता कुंडलिका पाणीपुरवठा योजनेच्या रुपये ३८.२४ कोटी किंमतीस दिनांक ०१/१२/२०२२ रोजी शासनाकडून प्रशासकीय मंजुरी मिळाली व दिनांक ३०/०१/२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आले. सदर योजनेची कामे प्रगतीपथावर असून, सद्यःस्थितीत भौतिक प्रगती ५२% इतकी झाली आहे.

त्यानुसार संबंधित ठेकेदारास झालेल्या कामाची व पाईप पुरवठ्याची देयके अदा करण्यात आली आहेत. योजनेवर एकूण माहे जानेवारी, २०२६ पर्यंत रुपये १९.३५ कोटी इतका खर्च झालेला आहे. सदर योजना माहे डिसेंबर, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, सदर योजना पूर्ण झाल्यानंतर समाविष्ट गावांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा होणार आहे.

सद्यःस्थितीत अस्तित्वातील योजनेमधून योजनेतील समाविष्ट गावांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

सदर जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर, योजना हस्तांतरीत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) योजनेंतर्गत समाविष्ट उपांगे जलशुद्धीकरण केंद्र तसेच भूस्तर उंच साठवण टाक्यांसाठी जागा उपलब्ध न झाल्याने तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची ऊर्ध्ववाहिनी/ गुरूत्ववाहिनीची परवानगी व वन विभागाची परवानगी उशिरा प्राप्त झाल्याने, योजनेची कामे करण्यास विलंब झाला आहे. सदर परवानग्या प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदाराने कामास सुरूवात न केल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्याबाबत

**(४२) * ७८१६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या अखत्यारित ८९ कोल्हापुरी बंधारे असून त्यापैकी निम्म्याहून अधिक बंधाऱ्यांना अद्यापही दरवाजे बसविण्यात न आल्याने मुबलक पाऊस होऊनही योग्य नियोजनाअभावी पाणी विनाकारण वाहून वाया जात असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लघु सिंचन विभागाच्या निष्काळजीपणामुळे पाण्याचा साठा उपलब्धता तसेच सदरच्या साठ्यापैकी शेतकऱ्यांना किती प्रमाणात पाणी सिंचनासाठी उपलब्ध आहे याबाबतची नोंद जलसंपदा विभागाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची कमतरता निर्माण होवू नये याकरीता पाण्याचे योग्य नियोजन करण्याकरीता कोल्हापुरी बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाणीसाठा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषद (ल.पा.) विभागाच्या अधिनस्त उपविभागाव्दारे रब्बी हंगामाकरीता अडविण्यात आलेल्या बंधाऱ्यातून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सिंचन साठ्यांची नोंदवही उपविभागीय स्तरावर ठेवण्यात आली असून सदर माहिती मार्च अखेर विभागीय स्तरावर संकलित केली जाते.

(३) शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची कमतरता होवू नये तसेच पाण्याचे योग्य नियोजन करण्याकरीता जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ९७ कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यांपैकी ६० बंधाऱ्यांचे दरवाजे बसविण्यात आले आहेत. त्यामधून एकूण ५०६३.४३ स.घ.मी. इतका पाणीसाठा निर्माण झालेला आहे. तसेच ३० को.प. बंधारे नादुरुस्त असून त्यांच्या दुरुस्तीची कामे उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदूर बाजार (जि.अमरावती) तालुक्यात अंगणवाडी परसबाग योजनेच्या निधीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४३) * ७०३५ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालकांच्या पोषणासाठी आणि अंगणवाड्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारे सक्षम अंगणवाडी परसबाग योजनेत चांदूर बाजार (जि.अमरावती) तालुक्यात तत्कालीन बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यकाळात निधीचा दुरुपयोग करुन मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याने या अधिकाऱ्यांच्या काळातील सर्व आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याबाबत तसेच तालुक्यातील सर्व अंगणवाडी परसबाग कामांच्या प्रकरणाची सखोल चौकशीची मागणी प्रहार संघटनेने केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीनुसार निधीचा दुरुपयोग करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर कालावधीमध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी पदाचा कार्यभार विस्तार अधिकारी (सांख्यिकी) यांचेकडे होता.प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २९/१२/२०२५ अन्वये जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) जिल्हा परिषद, अमरावती यांनी चौकशी समिती नेमली होती. चौकशी समितीच्या अहवालानुसार या बालविकास प्रकल्प अधिकारी विरूध्द जिल्हा परिषद स्तरावर शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील अंगणवाडी कामकाजातील गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत

**(४४) * ७९९१ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील अंगणवाड्यांच्या कामकाजात मागील तीन महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबतच्या अनेक तक्रारी लोकस्वराज्य संघटनेने आंदोलनाद्वारे तसेच गटविकास अधिकारी, धर्माबाद यांच्याकडे वारंवार लेखी निवेदनाद्वारे केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने बालविकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षक यांनी सदर भागातील एकाही केंद्राची पाहणी केलेली नसून शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन चौकशीअंती संबंधित गैरव्यवहारात दोषी असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) अंशतः खरे आहे.

लोकस्वराज्य आंदोलन या संघटनेमार्फत दिनांक ११/१२/२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडे निवेदन देण्यात आले होते. त्याची प्रत गटविकास अधिकारी, धर्माबाद यांना देण्यात आली होती. सदर निवेदनामध्ये अंगणवाडी केंद्रांमध्ये विद्यार्थी हजर नसतात, खाऊची (अन्न) व इतर साहित्याची मोठ्या प्रमाणावर अफरातफर होत असल्याबाबत, सुपरवायझर यांनी मागील तीन महिन्यांपासून एकाही अंगणवाडीला भेट दिली नाही, अधिकाऱ्यांची देखरेख नाही अशा तक्रारींचा समावेश होता.
(२) प्रस्तुत प्रकरणी बालविकास प्रकल्प अधिकारी, धर्माबाद यांनी चौकशी करून दिनांक १६/१२/२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे तीन प्रकल्पांचा पदभार असल्यामुळे तिन्हीही प्रकल्पांना दिवस ठरवून देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ठरवून दिलेल्या दिवशी प्रकल्प कार्यालय धर्माबाद येथे भेट देवून पर्यवेक्षिका यांचा आढावा घेऊन मार्गदर्शन व सूचना देणे तसेच कामकाजाचे नियोजन करून घेणे इत्यादी बाबी स्वतः ठरवून देत असल्याबाबत नमूद करण्यात आले आहे. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास), जिल्हा परिषद, नांदेड यांनी याबाबत तपासणी केली असून पर्यवेक्षिका यांना भेटीचे उदिष्टे पूर्ण करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. अंगणवाडी केंद्रामार्फत पुर्व प्राथमिक शिक्षण तसेच आहारासह इतर सर्व सेवा नियमित स्वरूपात देण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावळी सदोबा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) परिसरातील घरकुलांची बांधकामे रेती अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४५) * ७७०३ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावळी सदोबा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) परिसरात प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत मंजूर घरकुलांची बांधकामे शासनाने जाहीर केलेल्या पाच ब्रास मोफत रेती धोरणानुसार रेती पुरवठा न झाल्याने प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विशेषत: यवतमाळ जिल्ह्यातील सावळी-सदोबा (ता.आर्णी) परिसरातील घरकुलधारकांना पाच ब्रास मोफत रेती उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) माहे जून मध्ये पैनगंगा व अडान नदी मध्ये पाणी पातळी जास्त असल्याने रेती वाटप करण्याची परवानगी देता आली नाही. तथापि, महसूल विभागाने मौजा चिमटा, सावळी स.,दातोडी, खडका येथे जप्त केलेली रेती पात्र घरकुल लाभार्थी यांना वाटप करण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र दिनांक १३/०१/२०२६ व शासन निर्णय दिनांक ०८/०४/२०२५ नुसार आर्णी तालुक्यातील घरकुलाकरीता वाळू घाटातून वाळू वाटप करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रक्तदान शिबिरासाठी पारदर्शक व नियंत्रणात्मक ऑनलाईन प्रणाली विकसित करण्याबाबत

**(४६) * ६७०२ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य रक्त संक्रमण परिषदेने अनावश्यक व गरजेपेक्षा अधिक रक्तदान शिबिरे आयोजित करू नयेत, असे स्पष्ट आदेश दिले असतानाही सदर आदेशांचे उल्लंघन करून राज्यात सन २०२४-२५ या वर्षात हजारो रक्तदान शिबिरे आयोजित करून मोठ्या प्रमाणात रक्तसंकलन झाल्याची माहिती माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय गरजेपेक्षा अधिक प्रमाणात संकलित झालेल्या रक्ताचा वापर न झाल्यामुळे कालबाह्य झालेला रक्तसाठा नष्ट केला जातो त्यामुळे रक्तदान करणाऱ्यांचे सामाजिक योगदान वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रक्तदान शिबिरांच्या आयोजनाबाबत प्रभावी नियोजन, गरजेनुसार परवानगी व समन्वय यंत्रणा नसल्यामुळे अनावश्यक शिबिरे मोठ्या प्रमाणात सुरू असून त्यामुळे रक्तसाठवण, वाहतूक, तपासणी व नाश प्रक्रिया यावर अतिरिक्त खर्च होऊन अप्रत्यक्षपणे शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रक्तदान शिबिरे आयोजित करण्यापूर्वी शासनाची पूर्वपरवानगी घेणे, रक्ताची प्रत्यक्ष गरज, उपलब्ध साठा व वापर याचा आढावा घेणारी एकात्मिक ऑनलाईन प्रणाली अस्तित्वात नसल्यामुळे सदर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यात संकलित रक्ताचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी तसेच रक्तदान शिबिरांसाठी पूर्वपरवानगीची पारदर्शक, ऑनलाईन व नियंत्रणात्मक प्रणाली विकसित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

राज्य रक्त संक्रमण परिषदेने अनावश्यक व गरजेपेक्षा अधिक रक्तदान शिबीरे आयोजीत करु नयेत अशा प्रकरच्या सूचना दिनांक २६/१२/२०२५ रोजी दिल्या होत्या. त्यानुसार रक्तकेंद्रांनी त्यांच्या गरजेनुसार रक्त संकलन केलेले आहे.
(२) हे खरे नाही.

रक्त वाया जाऊ नये म्हणुन राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार एका रक्तकेंद्रात उपलब्ध असलेले अतिरिक्त रक्त दुसऱ्या रक्तकेंद्रात नियमानुसार स्थलांतरीत करण्यात येते. त्यामुळे रक्त कालबाह्य होऊन वाया जाण्यास प्रतिबंध होतो.

(३) हे खरे नाही.

रक्तकेंद्रांच्या गरजेनुसार रक्त संकलन करण्याविषयी सूचना दिलेल्या आहेत व त्यानुसारच रक्त संकलन करण्यात येते.

(४) केंद्र सरकारने ई-रक्तकोष पोर्टल सुरु केलेले आहे व सदरच्या पोर्टलवर सामाजिक संस्थेने रक्तदान शिबीर घेण्यापूर्वी नोंदणी करणे व त्यास मान्यता प्राप्त करणे याबाबतची तरतुद आहे. त्यानुसार संबंधित रक्तकेंद्रे रक्ताच्या आवश्यकतेनुसार स्वैच्छिक रक्तदान शिबीरास ऑनलाईन मान्यता देऊन रक्तदान शिबीरे घेत असतात. रक्तसाठ्याची अद्ययावत माहिती देखील या पोर्टलवर उपलब्ध आहे.

(५) केंद्र सरकारने देशामध्ये एकसमानता राहण्यासाठी ई-रक्तकोष पोर्टल विकसित केलेली आहे व त्यानुसार नियंत्रणात्मक प्रणाली कार्यान्वित आहे.

-----------------

## राज्यातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतंर्गतच्या लाभार्थ्यांना प्रलंबित आर्थिक मदत देण्याबाबत

**(४७) * ८०३२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनाथ, निराधार किंवा आई-वडील गमाविलेल्या ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतंर्गत दरमहा २,२५० रुपये आर्थिक मदत दिली जात असून कोरोनामध्ये पालक गमावलेल्या लाभार्थ्यांना दरमहा पी.एम. केअर फंड (PM CARES Fund) मधून प्रतिमाह ४,००० रुपये मदत दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ राज्यातील दीड लाख बालके घेत असून या आर्थिक वर्षांत लाभार्थ्यांना आठ महिन्यांपासून तसेच नव्याने अर्ज दाखल केलेल्या लाभार्थ्यांना एक ते दोन वर्षांपासून उक्त मदतीची रक्कम मिळाली नाही तसेच हिवाळी अधिवेशन, २०२५ मध्ये महिला व बालविकास विभागाकरीता ५ हजार २४ कोटी रुपयांच्या पुरवण्या मागण्या सभागृहात सादर करण्यात आल्या असून त्यात उपरोक्त लाभार्थ्यांना द्यावयाच्या रकमेकरीता निधीची तरतुद करण्यात येवूनही अद्याप निधी वितरीत करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागण्यांच्या प्रस्तावाबाबत तसेच वंचित बालकांना त्यांच्या शिक्षणासाठी व संगोपनासाठी प्रलंबित असलेला निधी त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे अंशत:खरे आहे

राज्यातील अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुलां-मुलींना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत दरमहा रुपये २२५०/- इतकी आर्थिक मदत दिली जाते. तसेच कोरोनामध्ये पालक गमावलेल्या लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या मिशन वात्सल्य योजनेंतर्गत दरमहा रुपये ४०००/- इतकी आर्थिक मदत दिली जाते.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे

सदर योजनेंतर्गत बालकांना निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने विभागास सन २०२५-२६ मधील अर्थसंकल्पीय तरतुद व पुरवणी मागणीद्वारे आतापर्यंत प्राप्त झालेला निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच आवश्यक उर्वरीत निधीसाठी फेब्रुवारी २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.